पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ५९ ● शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com




**सुविचार**

स्वप्नं तेव्हा खरी होतात, जेव्हा आपण ती पाहायला सुरुवात करतो

## »थोडक्यात

### महाराष्ट्राची वाघीण' अश्विनी पौळची तीन मुलांसह आत्महत्या

**धाराशिव :** 'महाराष्ट्राची वाघीण' म्हणून ओळख असलेली राष्ट्रीय स्तरावरील महिला कुस्तीपटू अश्विनी पौळ यांनी आपल्या तीन लहान मुलांसह ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्यावरून १०० फूट खोल दरीत उडी घेतली आहे. या थरकाप उडवणाऱ्या घटनेत कुस्तीपटू अश्विनी पौळ आणि त्यांचा साडेपाच वर्षांचा मुलगा अजिंक्य यांचा जागीच मृत्यू झाला. तर अडीच वर्षांच्या जुळ्या मुलींपैकी क्रांती नावाच्या चिमुरडीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच जुळ्या मुलींपैकी दुसरी मुलगी वीरा ही गंभीर जखमी असून, तिच्यावर धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात व्हेंटिलेटरवर उपचार सुरू आहेत. पती आणि सासरच्या मंडळींच्या सततच्या मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळूनच मुलीने आत्महत्या केल्याचा अश्विनी यांच्या वडिलांनी गंभीर आरोप केला आहे. पोलीस अधिकारी याबाबत कसून चौकशी करत आहेत.

### दरड कोसळल्याने रत्नागिरी-सातारा मार्ग ठप्प

**रत्नागिरी :** रत्नागिरी आणि सातारा जिल्ह्यांना जोडणाऱ्या खेड तालुक्यातील रघुवीर घाटात ३ सप्टेंबरच्या रात्री पुन्हा मोठी दरड कोसळल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. डोंगर उतारावरील माती, दगड आणि मोठमोठ्या शिळा रस्त्यावर आल्याने दोन्ही बाजूंची वाहतूक बंद झाली असून, घाटातून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. दरड कोसळल्याने सातारा जिल्ह्यातील घाटमाथ्यालगतच्या सुमारे १५ ते २० गावांचा रत्नागिरी जिल्ह्याशी असलेला संपर्क विस्कळीत झाला आहे.

### खा. राघव चड्डा यांचे नाव SIR यादीतून गायब!

**नवी दिल्ली:** भाजपचे राज्यसभेचे खासदार राघव चड्डा यांचे नाव मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पडताळणी (एसआयआर) प्रक्रियेतून वगळण्यात आल्याने गुरुवारी नव्या राजकीय वादाला तोंड फुटले. पंजाबच्या प्रारूप मतदारयादीत चड्डा यांना 'शिफ्टेड' म्हणजेच दुसरीकडे स्थायिक झाल्याचे दाखवण्यात आले असून, त्यांचे नावच गाळण्यात आले आहे. चड्डा यांनी या प्रकारासाठी आम आदमी पक्षाच्या पंजाब सरकारवर राजकीय सूडबुद्धीचा आरोप केला आहे. मात्र, 'आप'ने हा आरोप फेटाळून लावून एसआयआर पंजाब सरकार नव्हे, तर निवडणूक आयोग करत असल्याचे म्हटले आहे.



# राज्यात डीजेबंदीचे धाडस मुख्यमंत्र्यांनी दाखववावे!

## फडणवीसांना दिल्ली दौरे, डीजे वादावरून सवाल

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**मुंबई :** नागपुरात पोलिस आयुक्तांनी डीजे आणि लेझरवर बंदी घातली, मग पुण्यात वेगळा निर्णय का? हा एका शहरापुरता मर्यादित प्रश्न नसून लोकांच्या आरोग्याशी आणि मानसिक स्वास्थ्याशी जोडलेला विषय आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात डीजेबंदीचा धोरणात्मक निर्णय घेण्याची हिंमत गृहमंत्री दाखवणार का?' असा सवाल शिवसेना (उबाठा) नेते तथा खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार निशाणा साधत केला आहे.

ते पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी देशाचा जीडीपी, भाजपमधील अंतर्गत बंडाळी आणि राष्ट्रीय पातळीवरील संभाव्य राजकीय बदलांवरही रोखठोक भाष्य केले. ते पुढे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केंद्रीय मंत्रिमंडळात मोठा फेरबदल करायचा आहे, मात्र भाजपमधील अंतर्गत बंडाळीमुळे तो रखडला आहे. पक्षातील चार मूळ आणि ज्येष्ठ मंत्र्यांनी राजीनामे देण्यास नकार दिला असून, आधी अमित शहा यांचा राजीनामा घ्या, अशी थेट भूमिका या मंत्र्यांनी घेतली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची अशी इच्छा आहे की मंत्रिमंडळात 'उपपंतप्रधान' हे पद निर्माण करून त्या जागी संघाच्या विचारांचा एक तडफदार तरुण चेहरा आणला जावा, जो भविष्यातील वारसदार ठरेल. या पदासाठी फडणवीसांच्या नावाची चर्चा असल्यास त्यांना मराठी माणूस म्हणून आपल्या शुभेच्छा आहेत, असा टोला त्यांनी लगावला. डीजे आणि लेझर लाईट्समुळे ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि लहान मुलांचे आरोग्य धोक्यात येते, विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होतो. त्यामुळे गृहमंत्र्यांनी केवळ कायद्याच्या चौकटीची भाषा न करता संपूर्ण महाराष्ट्रासाठी एकच ठोस आणि धोरणात्मक निर्णय जाहीर करावा.

### दिल्लीच्या वाऱ्या कशासाठी?

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना दर ७२ तासांनी दिल्लीत का जावे लागते? शिवसेना ही 'मातोश्री' आणि शिवसेना भवनातून चालते, मात्र अमित शहा यांनी स्थापन केलेल्या मिंधे गट आणि अजित पवार गटाला आदेश घेण्यासाठी दिल्लीचे उंबरठे झिजवावे लागतात, अशी टीका त्यांनी केली.

### ७.८ टक्के जीडीपीचा दावा आभासी!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७.८ टक्के जीडीपी वाढीच्या दाव्याची राऊतांनी खिल्ली उडवली. या सरकारचे सगळेच आभासी आहे. स्वतःला 'नॉन-बायोलॉजिकल' आणि देवाचा अवतार समजणाऱ्यांना आभासी गोष्टीतच आनंद मिळतो. परदेश दौऱ्यांवरून रात्री १२ वाजता रील्स बनवून जीडीपी वाढल्याचे सांगण्यापेक्षा देशात येऊन पत्रकारांसमोर आर्थिक आकडेवारी मांडण्याची हिंमत दाखवावी.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ऑक्टोबर महिन्यात अकोल्यात !

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अकोला :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात अकोल्याला येणार आहेत. यावेळी त्यांच्या हस्ते जवळपास एक हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ, लोकार्पण आणि भूमिपूजन होणार आहे.

यामध्ये सिटी बस सेवा, तलाव सुशोभीकरण, सांस्कृतिक व क्रीडा भवन, मेन हॉस्पिटल, बोरगाव मंजू येथील रुग्णालय तसेच विविध सामाजिक उपक्रमांचा समावेश आहे.महात्मा ज्योतिबा फुले कर्जमाफी योजनेत शेतक-यांना समाविष्ट करून शेतकऱ्यांचे कल्याण करणाऱ्या मुख्यमंत्री फडणवीस यांचा अकोला जिल्ह्यातील कर्जमाफी प्राप्त शेतकऱ्यांच्या वतीने आणि विविध शेतकरी संघटनांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात येणार आहे. यासाठी प्रयत्नशील असणारे आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या मागणीला मुख्यमंत्र्यांनी पाठबळ दिले होते. दरम्यान, महात्मा ज्योतिबा फुले कर्जमाफी योजनेचा दिलासा मिळाल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यासाठी आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या मागणीला मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक पाठबळ दिले होते. या निर्णयामुळे कर्जमुक्त झालेल्या अकोला जिल्ह्यातील हजारो शेतकरी व विविध शेतकरी संघटनांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा भव्य जाहीर सत्कार केला जाणार आहे.





### मुख्यमंत्री जाहीर सभेला संबोधित करणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, आ. रणधीर सावरकर, आ. हरीश पिंपळे, आ. प्रकाश भारसाकळे, जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, महानगराध्यक्ष जयंत मसने, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, महापौर शारदा खेडकर यांच्या नेतृत्वात वेगवेगळ्या समित्या गठित करण्यात आल्या आहेत.

# जिवंत राहिलो तर मोर्चात सहभागी होणार- बापट

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**पुणे :** माझ्यावर झालेला भ्याड हल्ला ही वैचारिक दिवाळखोरी आहे. नरेंद्र दाभोलकरांसारख्या विचारवंतांचा सकाळी मॉर्निंग वॉकला गेल्यावर खून झाला होता, त्यामुळे पुढे काय होईल हे सांगता येत नाही; पण जर मी जिवंत राहिलो आणि जाण्याजोग्या परिस्थितीत असेन, तर रविवारी पुण्यात निघणाऱ्या मोर्चात नक्की सहभागी होईन,' असा निर्धार विद्यानंद बापट यांनी व्यक्त केला. टिळक रस्त्यावर झालेल्या मारहाणीच्या घटनेनंतर अवघ्या २४ तासांत सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांनी पत्रकार परिषद घेत आपली आक्रमक आणि रोखठोक भूमिका मांडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या पोलीस संरक्षणाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले, मात्र पोलिसांनी दिलेल्या सूचनेनुसार उघड्यावर पत्रकार परिषद न घेता बंदिस्त जागेत माध्यमांशी संवाद साधला. बापट हे मूळचे पुणेकर नसल्याच्या टीकेला उत्तर देताना ते म्हणाले, 'मी कुठला आहे किंवा कोण आहे, हा मुद्दाच नाही. जेव्हा समोरच्या व्यक्तीला मूळ विषयाचा तार्किक प्रतिवाद करता येत नाही, तेव्हा तो अशा पळवाटा शोधतो. यालाच तर्कामध्ये 'अॅड हॉमिनेम फॅलसी' म्हणतात. सार्वजनिक ठिकाणी उत्सव साजरा करताना कर्णकर्कश ध्वनिप्रदूषण आणि वाहतुकीची कोंडी नागरिकांवर लादली जाते. हा सर्वसामान्य पुणेकरांना होणारा थेट उपद्रव आहे आणि त्यावर बोलण्याचा प्रत्येक करदात्या नागरिकाला घटनादत्त अधिकार आहे, असेही विद्यानंद बापट म्हणाले. ज्या व्यवसायामुळे लाखो नागरिकांना मानसिक आणि शारीरिक त्रास होतो, तो व्यवसाय कायदेशीर किंवा तार्किकदृष्ट्या चालू ठेवताच येत नाही.



# तीन दिवसांत निर्णय न झाल्यास सलाईन-पाणी बंद!

## » जरांगेंचा सरकारला 11 तारखेचा अल्टिमेटम



प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**छ.संभाजीनगर :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटीत सुरू असलेले आमरण उपोषण आज सातव्या दिवशीही कायम आहे. गुरुवारी सरकारच्या शिष्टमंडळाने जरांगे पाटील यांची भेट घेऊन चर्चा केली आणि सरकार मागण्यांबाबत सकारात्मक असल्याचे स्पष्ट केले. पण या भेटीनंतरही जरांगे पाटील उपोषणावर ठाम आहेत. 'सरकारला खूप वेळ दिला, आता अधिक वेळ देऊ शकत नाही; आम्हाला केवळ आश्वासने नको, तर थेट कृती हवी,' अशी आक्रमक भूमिका त्यांनी घेतली आहे. सरकारला इशारा देताना जरांगे पाटील म्हणाले की, ११ सप्टेंबरपर्यंत आमच्या मागण्यांची अंमलबजावणी करावी. अन्यथा १२ सप्टेंबर रोजी मराठा समाजाची बैठक घेऊन मुंबईतील आंदोलनाची पुढील दिशा ठरवली जाईल. 'सरकारला तीन वर्षे वेळ दिला आहे. आता यापेक्षा जास्त वेळ देणे शक्य नाही. हैदराबाद गॅझेटिअर, ५८ लाख कुणबी नोंदी आणि सातारा-कोल्हापूरसह औंध गॅझेटिअर लागू करण्याच्या मुद्द्यांवर आम्ही ठाम आहोत,' असे त्यांनी स्पष्ट केले.सध्या बिघडलेल्या प्रकृतीमुळे सुरू असलेल्या उपचारांवर बोलताना ते म्हणाले, 'दोन-चार सलाईन लावल्यामुळे मला आज बोलता येत आहे. सरकारने विनंती केली म्हणून मी सलाईन लावून घेतली आहे. मात्र, मी आणखी दोन ते तीन दिवस वाट पाहीन. त्यानंतर सलाईन काढून टाकेन आणि पाणी तसेच इतर सर्व उपचार पूर्णपणे बंद करेन.', असेही जरांगे पाटील म्हणाले.

### राधाकृष्ण विखे पाटील यांनी राजीनामा द्यावा!

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचा आज सातवा दिवस असतानाही अद्याप कोणताच ठोस तोडगा निघालेला नाहीये. त्यामुळे मराठा आंदोलक चांगलेच आक्रमक झाले आहेत. जरांगे यांच्या समर्थनासाठी आंदोलकांनी रास्तारोको, निदर्शने, आंदोलने सुरू केली आहेत. तसेच अनेक जिल्ह्यात बंदही पुकारला आहे. त्यातच राधाकृष्ण विखे पाटील यांनीच्या मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा. त्यांनी राजीनामा दिला नाही तर मुख्यमंत्र्यांनी त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी केली आहे.

# रॉयल्टी असूनही शेतकऱ्याला दोन लाखांचा दंड

## रॉयल्टी पावती चुकीची ठरवत दंडाची कारवाई, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अकोला :** स्वतःच्या घराच्या बांधकामासाठी शासनाच्या अधिकृत वाळूघाटातून पाच ब्रास वाळू घेतल्यानंतरही एका शेतकऱ्यावर तब्बल दोन लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. अकोला तालुक्यातील एकलारा येथील शेतकरी चेतन गजानन खेडकर यांनी या कारवाईवर आक्षेप घेत असून, आपल्याकडे वाळूची रॉयल्टी पावती असतानाही दंड का करण्यात आला, असा सवाल उपस्थित केला आहे.

खेडकर यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी स्वतःच्या घराच्या बांधकामासाठी शासनाच्या वाळूघाटातून पाच ब्रास वाळू घेतली होती. त्यासाठी त्यांच्याकडे रॉयल्टीची पावतीही होती. मात्र, गावातील एका व्यक्तीने अकोला तहसीलदारांकडे तक्रार केल्यानंतर महसूल विभागाकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात आली. चौकशीत संबंधित रॉयल्टी पावती चुकीची असल्याचे नमूद करून शेतकऱ्यावर सुमारे दोन लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आल्याचे खेडकर यांनी सांगितले.

**'मी कोणतीही चूक केली नाही'**

आपण शासनाच्या अधिकृत वाळूघाटातून वाळू घेतली असून, घराच्या बांधकामासाठीच तिचा वापर केला आहे. वाळू घेताना रॉयल्टी भरली असताना आपल्यावर एवढ्या मोठ्या रकमेचा दंड का आकारण्यात आला, याचे स्पष्ट उत्तर प्रशासनाने द्यावे, अशी मागणी खेडकर यांनी केली आहे. रॉयल्टी पावती चुकीची असल्याचे प्रशासनाचे म्हणणे असल्यास ती पावती कशी चुकीची ठरली, याचीही सविस्तर माहिती देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांना घरबांधणीसाठी वाळू उपलब्ध करून देण्याबाबत धोरण आखले असताना, आपल्या बाबतीत दंडाची कारवाई का करण्यात आली, असा प्रश्नही खेडकर यांनी उपस्थित केला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून आपल्याला न्याय द्यावा, अशी विनंती त्यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे. दंडाची कारवाई मागे न घेतल्यास अकोला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण मांडले आहे. या प्रकरणात प्रशासनाची बाजू आणि रॉयल्टी पावतीची वैधता याबाबत अधिकृत स्पष्टीकरण समोर आल्यानंतरच कारवाईचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

# छत्रपती संभाजीनगरच्या एशियन हॉस्पिटलमध्ये भीषण आग!

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील एशियन हॉस्पिटलमध्ये भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. आकाशवाणी चौकातील एशियन हॉस्पिटलमध्ये शुक्रवारच्या पहाटे पावणे तीनच्या सुमारास ही आग लागली असल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, हॉस्पिटलच्या लहान मुलांच्या अतिदक्षता विभागात म्हणजेच एनआयसीयूमध्ये आग लागल्याने एकच खळबळ उडाली असून आगीच्या वेळी एनआयसीयूमध्ये ९ बालकं उपचार घेत होती. तर एसीच्या शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याची कुठलीही जीवितहानी झालेली नाही. तर यातील ५ बालकांना घाटी प्रयत्न करत अवघ्या १० ते १५ मिनिटांत आगीवर नियंत्रण मिळवलं.




### अमरावतीची पुनरावृत्ती टळली!

नुकत्याच अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात नवजात शिशु कक्षाला लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली होती. आता छत्रपती संभाजीनगरच्या हॉस्पिटलमध्ये देखील अशीच आगीची घटना घडल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले असून नागरिकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे.

### कॉकरोच पार्टी 46 दिवसांनंतर रस्त्यावर!

**नवी दिल्ली :** कॉकरोच जनता पार्टीने शुक्रवारी पक्ष कार्यकर्ती निशू भारद्वाज यांचे वडील संजय यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करण्यासाठी पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला. या निदर्शनांमध्ये सीजेपीचे नेते सौरभ दास आणि आशुतोष रांका यांनीही सहभाग घेतला. निशूचा आरोप आहे की, २३ जून रोजी जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनात त्यांचे वडील संजय यांच्यावर हल्ला करण्यात आला. त्यात त्यांच्या डोक्याला दुखापत झाली. सीजेपीचे म्हणणे आहे की, या घटनेबाबत जवळपास दीड महिन्यापूर्वीच एफआयआर दाखल करण्यात आला. पण आरोपी स्वतंत्र भारद्वाज याच्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. दरम्यान, स्वतंत्र याचा एक पॉडकास्ट व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यात तो संजय यांच्यावर केलेल्या हल्ल्याची कबुली देताना दिसत आहे. पण आता तो आपण ही कृती स्वसंरक्षणार्थ केल्याचा दावा करत आहे.







# दोन जन्माष्टमी... एकच अध्यात्मिक धागा!

## श्रीकृष्णापासून ज्ञानेश्वर माऊलींपर्यंतचा ज्ञानप्रकाश

भारतीय अध्यात्म परंपरेत काही तिथी केवळ दिनदर्शिकेतील नोंदी राहत नाहीत; त्या श्रद्धेच्या, विचारांच्या आणि संस्कृतीच्या दीपस्तंभ बनतात. श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि संत ज्ञानेश्वर माऊलींची जन्मतिथी याकडे अशाच एका विलक्षण आध्यात्मिक अनुबंधातून पाहता येते.

श्रीकृष्णांचा जन्म भाद्रपद कृष्ण अष्टमीला, मध्यरात्री झाला, अशी हिंदू धार्मिक परंपरा आहे. म्हणून ही तिथी 'श्रीकृष्ण जन्माष्टमी' किंवा 'गोकुळाष्टमी' म्हणून ओळखली जाते. दुसरीकडे संत ज्ञानेश्वर महाराजांचा जन्म श्रावण वद्य अष्टमीला, शके ११९७ मध्ये झाला, अशी परंपरागत मान्यता आहे. त्यामुळे दोघांची जन्मतिथी एकच नाही; परंतु दोन्ही जन्म अष्टमी तिथीशी जोडलेले आहेत. याच साम्यामुळे 'जन्माष्टमी' हा शब्द माऊलींच्या जन्मस्मरणाशीही भावनिकरित्या जोडला गेला आहे. परंतु या दोन जन्मांतील खरा दुवा तिथीपेक्षा मोठा आहे—तो आहे ज्ञानाचा आणि लोककल्याणाचा!

श्रीकृष्णांनी कुरुक्षेत्रावर अर्जुनाला भगवद्गीतेच्या माध्यमातून कर्म, ज्ञान, भक्ती आणि जीवनधर्माचा मार्ग दाखविला. युद्धभूमीवर उभ्या असलेल्या संभ्रमित मनाला त्यांनी कर्तव्याची दिशा दिली. 'कर्म



करीत राहा, फलाची आसक्ती ठेवू नका' हा संदेश केवळ अर्जुनासाठी नव्हता; तो पुढील हजारो वर्षांसाठी मानवी जीवनाला दिलेला मार्गदर्शक दीप होता. याच ज्ञानपरंपरेला महाराष्ट्राच्या मातीत लोकभाषेचा, लोकजीवनाचा आणि भक्तीचा स्पर्श देणारे संत ज्ञानेश्वर माऊली! संस्कृतमधील गीतेचा गूढार्थ सामान्य माणसाच्या मनापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी 'भावार्थदीपिका' अर्थात ज्ञानेश्वरी लिहिली. त्यामुळे ज्ञानेश्वरी ही केवळ ग्रंथव्याख्या राहिली नाही; ती महाराष्ट्राच्या लोकजीवनातील ज्ञानाची गंगोत्री बनली. कृष्णाने अर्जुनाला सांगितलेले तत्त्वज्ञान आणि ज्ञानेश्वरांनी जनसामान्यांसाठी उलगडलेले तत्त्वज्ञान यांच्यातील हा संबंध अत्यंत सुंदर आहे. कृष्णाने गीता सांगितली; ज्ञानेश्वरांनी तिचा भावार्थ लोकांच्या हृदयात उतरविला. एकाने युद्धभूमीवरील संभ्रमित योद्ध्याला जागविले, तर दुसऱ्याने अज्ञानाच्या अंधारात असलेल्या समाजाला ज्ञानाची वाट दाखविली. एकाने धर्माला कर्माशी जोडले, तर दुसऱ्याने ज्ञानाला भक्तीची आणि लोकभाषेची जोड दिली. म्हणूनच कृष्ण आणि ज्ञानेश्वर यांच्यातील नाते केवळ भक्तीचे नाही; ते विचारांचे, ज्ञानाचे आणि मानवकल्याणाचे नाते आहे. कृष्णाच्या जन्माची मध्यरात्र ही प्रतीकात्मकदृष्ट्याही विलक्षण आहे. अंधाराच्या मध्यभागी प्रकाशाचा जन्म होतो. ज्ञानेश्वरांच्या जीवनाकडे पाहिले तरी हेच जाणवते—सामाजिक संघर्ष, उपेक्षा आणि प्रतिकूलतेच्या काळात त्यांनी ज्ञानाचा दीप प्रज्वलित केला. म्हणून 'जन्माष्टमी'कडे केवळ उत्सव म्हणून पाहण्यापेक्षा तिच्या अंतरंगातील संदेश समजून घेण्याची गरज आहे. अंधार कितीही गडद असला तरी ज्ञानाचा एक दिवा त्याला आव्हान देऊ शकतो. आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या, माहितीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात हा संदेश अधिक महत्त्वाचा आहे. माहिती सहज उपलब्ध झाली आहे; पण ज्ञान, विवेक आणि मूल्यदृष्टी अजूनही आत्मसात करावी लागते.

कृष्ण आपल्याला कर्मयोग शिकवितात; ज्ञानेश्वर माऊली त्या ज्ञानाला लोकाभिमुख करतात. म्हणून या दोन 'अष्टमीं'चा उत्सव साजरा करताना एक प्रश्न स्वतःला विचारता येईल. आपल्या आयुष्यातील अंधार दूर करण्यासाठी आपण ज्ञानाचा कोणता दिवा पेटवणार आहोत ?कृष्णाचा जन्म असो वा ज्ञानेश्वरांचा जन्म—दोन्ही स्मरणे शेवटी आपल्याला एका दिशेने घेऊन जातात : भक्तिला ज्ञानाची जोड द्या, ज्ञानाला कर्माची जोड द्या आणि कर्माला लोककल्याणाची दिशा द्या. हीच कदाचित दोन जन्माष्टमींना जोडणारी खरी अध्यात्मिक ज्ञानपरंपरा आहे.

प्रा. डॉ. सुहास उगले
अकोला

# विकासाच्या वाटेवर मानवजातीचे आरोग्य हरवत आहे का?

**रुग्णालयांची वाढ आणि आरोग्याची घट-ही विसंगती का?**

आज अत्याधुनिक रुग्णालये वाढत आहेत. यंत्रसामग्री वाढत आहे. वैद्यकीय तंत्रज्ञान अधिक सक्षम होत आहे. पण जर रुग्णांची संख्याही त्याच वेगाने वाढत असेल, तर प्रतिबंधात्मक आरोग्यव्यवस्थेचा आपण पुरेसा विचार करतो आहोत का? आपण आजार झाल्यानंतर उपचार करण्यावर मोठा खर्च करतो; पण आजार होऊ नये यासाठी पुरेशी गुंतवणूक करतो का? प्रतिबंध हा उपचारापेक्षा श्रेष्ठ आहे, ही संकल्पना केवळ पुस्तकात राहता कामा नये. शाळांमध्ये आरोग्यशिक्षण, योग्य आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य, स्वच्छता, प्रदूषणाचे परिणाम, व्यसनांपासून दूर राहणे आणि आरोग्यविषयक वैज्ञानिक दृष्टिकोन याबाबत प्रत्यक्ष शिक्षण दिले पाहिजे.

**शिक्षण म्हणजे फक्त नोकरी मिळवण्याचे साधन नाही**

आज शिक्षणक्षेत्राकडे पाहिले तर आणखी एक गंभीर प्रश्न समोर येतो. शिक्षणाचा उद्देश केवळ पैसा कमावणे, स्पर्धेत पुढे जाणे आणि मोठी नोकरी मिळवणे एवढाच राहिला आहे का? शिक्षणाने माणसाला केवळ माहिती मिळायला नको; शिक्षणाने माणूस घडायला हवा.

कसे जगावे?
कसे बोलावे?
समाजाशी कसे वागावे?
निसर्गाची काळजी कशी घ्यावी?
काय करावे आणि काय करू नये?
आपल्या जीवनाचे मूल्य काय आहे?
इतरांच्या दुःखाची जाणीव कशी ठेवावी?
समाजासाठी आपली जबाबदारी काय आहे?

**हेही शिक्षणाचा भाग असले पाहिजे.**

आज जर शिक्षित माणूसच निसर्गाची नासधूस करत असेल, प्रदूषण वाढवत असेल, अन्नात भेसळ करत असेल, फक्त नफा मिळवण्यासाठी चुकीच्या गोष्टी करत असेल, तर त्या शिक्षणाचा खरा अर्थ काय? शिक्षणाने बुद्धिमत्ता वाढण्याबरोबर विवेकही वाढला पाहिजे. पृथ्वी ही केवळ वापरण्याची वस्तू नाही मानवाने पृथ्वीवर अधिकार गाजवण्यापेक्षा पृथ्वीबरोबर सहजीवन शिकले पाहिजे.

हवा दूषित झाली, पाणी प्रदूषित झाले, मातीची सुपीकता कमी झाली, जंगलांचे प्रमाण घटले, जैवविविधता नष्ट झाली, समुद्र आणि नद्या प्रदूषित झाल्या तर त्याचा अंतिम परिणाम मानवावरच होणार आहे. आपण पृथ्वीला जिंकण्याचा प्रयत्न करतो आहोत; पण प्रत्यक्षात आपण स्वतःचेच भविष्य धोक्यात घालत आहोत. पृथ्वी नष्ट करण्याचा प्रयत्न करू नका; पृथ्वीला मजबूत, सक्षम आणि निरोगी बनवण्याचा प्रयत्न करा. कारण पृथ्वीचे आरोग्य आणि मानवाचे आरोग्य वेगळे नाही.

**सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची**

या प्रश्नाकडे केवळ व्यक्तीच्या जबाबदारीच्या दृष्टीने पाहून चालणार नाही. शासनानेही आरोग्य आणि पर्यावरण याबाबत दीर्घकालीन धोरणे आखली पाहिजेत. शेतीतील रसायनांचे परीक्षण, अन्नातील भेसळ, पाण्याची गुणवत्ता, हवेचे प्रदूषण, औषधांची गुणवत्ता, वैद्यकीय उपचारांमधील पारदर्शकता, अनावश्यक वैद्यकीय खर्च, ग्रामीण भागातील आरोग्यसेवा आणि प्रतिबंधात्मक आरोग्यव्यवस्था याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

आरोग्यसेवा सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यात राहिली पाहिजे.डब्ल्यू, एच, ओ सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनीही बदलत्या आजारांच्या पद्धती, पर्यावरणीय घटक, जीवनशैली आणि सार्वजनिक आरोग्य यांचा सातत्याने अभ्यास करून देशांना मार्गदर्शन केले पाहिजे. परंतु सरकार किंवा आंतरराष्ट्रीय संस्था सर्व काही करतील, अशी अपेक्षा करून आपण मोकळे होऊ शकत नाही.

**नागरिकांची जबाबदारीही तितकीच मोठी आहे.**

आपण नेमके कोणत्या विकासाच्या दिशेने जात आहोत? आज आपण आर्थिक विकासाचा दर मोजतो. उद्योगांची संख्या मोजतो. उत्पादन वाढ किती झाली ते मोजतो. तंत्रज्ञान किती पुढे गेले ते मोजतो.

**पण आपण हेही मोजतो का—**

किती लोक निरोगी आहेत?
किती मुले कुपोषणापासून मुक्त आहेत?
किती कुटुंबे उपचारांच्या खर्चामुळे आर्थिक संकटात सापडत नाहीत? आपली हवा किती स्वच्छ आहे? आपले पाणी किती सुरक्षित आहे? आपली माती किती निरोगी आहे? आपली मानसिक स्थिती किती चांगली आहे? आणि सर्वांत महत्त्वाचे—आपल्या पुढील पिढीसाठी आपण कशी पृथ्वी सोडून जाणार आहोत? या प्रश्नांची उत्तरे विकासाची खरी दिशा ठरवतील.

**मानवजातीसमोरचा सर्वांत मोठा प्रश्न**

आपण जर चंद्रावर पोहोचलो, पण आपल्या गावातील पाणी शुद्ध ठेवू शकलो नाही, तर त्या प्रगतीचा पुनर्विचार करावा लागेल. आपण कृत्रिम बुद्धिमत्ता निर्माण केली, पण मानवी संवेदना गमावली, तर त्या बुद्धिमत्तेचा उपयोग काय?

आपण कोट्यवधींची रुग्णालये बांधली, पण सामान्य माणसाला उपचार परवडत नसतील, तर त्या व्यवस्थेचा पुनर्विचार करावा लागेल. आपण मोठमोठ्या शैक्षणिक संस्था उभ्या केल्या, पण त्यातून समाजाबद्दल जबाबदारीची भावना निर्माण होत नसेल, तर शिक्षणाचा उद्देश पुन्हा तपासावा लागेल. आणि आपण अमाप संपत्ती निर्माण केली, पण निरोगी हवा, स्वच्छ पाणी, सुपीक जमीन आणि सुरक्षित भविष्य आपल्या मुलांना देऊ शकलो नाही, तर आपण खरेच प्रगत झालो आहोत का?

**आरोग्य हीच खरी संपत्ती**

शेवटी एक गोष्ट आपण सर्वांनी लक्षात ठेवली पाहिजे. पैसा पुन्हा कमावता येतो; परंतु गेलेले आरोग्य नेहमीच पूर्णपणे परत मिळेल असे नाही. म्हणून आरोग्याला खर्चाचा विषय न मानता गुंतवणुकीचा विषय मानला पाहिजे. निरोगी समाज हा कोणत्याही राष्ट्राची खरी ताकद असतो.

**आपल्याला विज्ञान हवे आहे.**

आपल्याला आधुनिक तंत्रज्ञान हवे आहे. आपल्याला उद्योग हवे आहेत. आपल्याला आर्थिक विकास हवा आहे.

आपल्याला आधुनिक वैद्यकीय सुविधा हव्या आहेत. पण या सगळ्यांच्या केंद्रस्थानी माणूस आणि त्याचे आरोग्य असले पाहिजे. विकासाचा अर्थ केवळ उंच इमारती, मोठे उद्योग, आधुनिक यंत्रे आणि वाढती अर्थव्यवस्था नाही. विकासाचा खरा अर्थ असा आहे की आजचा माणूस उद्याच्या माणसापेक्षा अधिक सुरक्षित, निरोगी, सुशिक्षित, संवेदनशील आणि आनंदी असावा. आपण पुढच्या पिढीला केवळ संपत्ती देऊ नये; आपण त्यांना स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, निरोगी माती, सुरक्षित अन्न, चांगले शिक्षण आणि जगण्याची आशा द्यायला हवी.

**कारण शेवटी प्रश्न एवढाच आहे—**

आपण पुढच्या पिढीसाठी काय निर्माण करतो आहोत—संपत्तीचा वारसा की संकटांचा वारसा? आजच आपण थांबून विचार केला पाहिजे. कारण मानवजातीचे भविष्य केवळ विज्ञानाच्या प्रयोगशाळांमध्ये ठरणार नाही; ते आपल्या शेतीत, आपल्या अन्नात, आपल्या पाण्यात, आपल्या शिक्षणात, आपल्या आरोग्यव्यवस्थेत आणि आपल्या विवेकबुद्धीत ठरणार आहे.आरोग्य हीच खरी धनसंपदा आहे. आणि निरोगी मानवजातीशिवाय कोणताही विकास पूर्ण होऊ शकत नाही.

**समाप्त**

निवृत्ती तायडे
रा. हिवरखेड ता. तेल्हारा. जि. अकोला

# गुन्हेगार कोण तयार करतय? मायबापांनी आता तरी जागा व्हायचं का?

आज आपल्या अमरावतीतच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात गुन्हेगारीचं प्रमाण पाहिलं की खरंच काळजी वाटते. ज्या वयात पोरांच्या हातात पुस्तक, पेन आणि खेळाचं साहित्य पाहिजे, त्या वयात काही पोरांच्या हातात चाकू दिसतोय. दारू, गांजा, एमडीसारख्या मादक पदार्थांकडे तरुण पिढी आकर्षित होतेय. हा सगळा प्रकार बघून एकच प्रश्न पडतो—आपला समाज चाललाय तरी कुठं?

अलीकडे अमरावतीच्या रवी नगर परिसरात एका मुलीची हत्या झाल्याची घटना समोर आली. अशा घटना मन सुन्न करून टाकतात. आज एखाद्या घरची मुलगी, उद्या आपल्या घरची बहीण किंवा मुलगी... ही भीती सामान्य माणसाच्या मनात निर्माण झाली तर आपण शांत कसं बसणार? एखादा गुन्हा करणारा अल्पवयीन आहे म्हणून गुन्ह्याची गंभीरता कमी होत नाही. हत्या म्हणजे हत्या! एखाद्याचं आयुष्य संपतं आणि एका कुटुंबाचं संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होतं. म्हणून आता या विषयावर फक्त चर्चा करून भागणार नाही.

कायद्यात अल्पवयीन गुन्हेगारांबाबत असलेली 18 वर्षांची वयोमर्यादा आणि गंभीर गुन्ह्यांवरील तरतुदी यांचा सरकारने आणि कायदेतज्ज्ञांनी नव्याने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी समाजातून पुढे येण्याची गरज आहे. विशेषतः 14 वर्षांवरील मुलांकडून होणाऱ्या गंभीर गुन्ह्यांबाबत कायद्यात आणखी कठोर आणि प्रभावी तरतुदी करता येतील का, याचा विचार झाला पाहिजे. कारण 14-15 वर्षांच्या वयात एखादं पोरं जाणीवपूर्वक गंभीर हत्या करत असेल, तर त्याला फक्त "लहान आहे" म्हणून समाजाच्या सुरक्षेचा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. पण त्याचबरोबर हेही लक्षात घ्यायला पाहिजे की प्रत्येक अल्पवयीन मुलगा गुन्हेगार नाही. त्यामुळे कायद्यात बदल करताना मुलांचं पुनर्वसन, समुपदेशन, शिक्षण आणि सुधारण्याची संधी यांचाही विचार झाला पाहिजे.

**एमडीच्या नशेत आपली तरुण पिढी कुठे चालली आहे?**

आज एमडीसारख्या मादक पदार्थांचं आकर्षण युवकांमध्ये वाढत असेल, तर हा फक्त पोलिसांचा प्रश्न नाही—हा संपूर्ण समाजाच्या भवितव्याचा प्रश्न आहे.आज एक पोरं नशा करतंय. उद्या त्याला नशेसाठी पैसे पाहिजेत. पैसे नाही मिळाले तर चोरी. चोरीतून मोठा गुन्हा. आणि हळूहळू गुन्हेगारी टोळ्यांमध्ये प्रवेश. ही साखळी तोडायची असेल तर ड्रग्ज विकणाऱ्यांवर सर्वात आधी आणि सर्वात कठोर कारवाई झाली पाहिजे. लहान पोरांना नशेच्या जाळ्यात ओढणाऱ्या लोकांना सोडून चालणार नाही. शाळा-कॉलेजच्या परिसरात, गल्लीबोळात आणि शहरात मादक पदार्थांचा पुरवठा करणाऱ्या नेटवर्कवर पोलिसांनी ठोस कारवाई केली पाहिजे.

**मायबापांनी सुद्धा स्वतःला प्रश्न विचारावा**

पोरगा रात्री कुठे जातो? कोणासोबत फिरतो? त्याच्याकडे अचानक एवढे पैसे कुठून येतात? मोबाईलमध्ये काय चाललंय? कोणत्या लोकांची संगत आहे? दारू किंवा नशा तर करत नाही ना?

**हे प्रश्न वेळेत विचारले पाहिजेत.**

मायबापांनी पोराला फक्त पैसा आणि मोबाईल देऊ नये; वेळ, संस्कार आणि शिस्तसुद्धा द्यावी. आज पोराला थांबवलं तर कदाचित उद्या एक गुन्हा थांबेल. आता शासन, पोलीस आणि समाजाने एकत्र येण्याची वेळ सरकारने मादक पदार्थांविरोधात कठोर मोहीम राबवली पाहिजे. पोलिसांनी गुन्हेगारांच्या टोळ्यांवर सातत्याने कारवाई केली पाहिजे. गंभीर आणि सराईत गुन्हेगारांवर कायद्यानुसार कडकात कडक शिक्षा झाली पाहिजे. काही लोकांच्या मनात "मोठ्या गुन्हेगारांचे एन्काऊंटर झाले पाहिजे" अशी भावना निर्माण होते, कारण सामान्य माणूस गुन्हेगारांच्या दहशतीला कंटाळला आहे. पण कायदा हातात घेण्याऐवजी, पोलिसांनी आणि न्यायव्यवस्थेने कायद्याच्या चौकटीत कठोर आणि जलद कारवाई करून गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण केला पाहिजे.

**सामान्य माणसाला एवढंच पाहिजे—**

आपल्या घरातून बाहेर पडताना भीती वाटू नये. आपल्या मुली सुरक्षित असाव्यात. आपली पोरं नशेपासून दूर असावीत. आणि रस्त्यावर गुन्हेगारांची दहशत नसावी. आज आपण गप्प बसलो तर उद्या परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. देशाचं भविष्य संसदेत नाही, आपल्या घरात वाढतंय. आजची पिढी आपण कशी घडवतो, त्यावर उद्याचा भारत ठरणार आहे.

**म्हणून आजच ठोस पावलं उचलण्याची गरज आहे.**

पोरांच्या हातात चाकू नको—पुस्तक पाहिजे. नशेची पुडी नको—खेळाचं साहित्य पाहिजे. गुन्हेगारीची टोळी नको—चांगली संगत पाहिजे. दहशत नको—कायद्याचा धाक पाहिजे. आणि सर्वात महत्त्वाचं. "आपल्या घरातलं पोरगं आहे, काही करणार नाही" या गैरसमजातून प्रत्येक मायबापाने बाहेर पडण्याची वेळ आली आहे. कारण आज दुसऱ्याच्या घरात घडलेली घटना उद्या आपल्या दारात येऊ नये, यासाठी आजच समाज, मायबाप, पोलीस आणि शासनाने एकत्र उभं राहणं गरजेचं आहे.

शुभम परळीकर
युवासेना उपजिल्हाप्रमुख

# जमीन, हवा, पाणी शुद्धतेवर भर द्यावाच लागेल

सिमेंटचा वापर, डांबरीकरण, औद्योगिकीकरण, प्रचंड लोकसंख्येमुळे मलमूत्रादी कचरा, जैविक कचरा, प्लास्टिक कचरा यामुळे जमिनीचे एकंदरच प्रदूषण वाढले. रासायनिक शेतीने पाणी संपवले व नवनवीन रोगराईला जन्म दिला. विषयुक्त अन्नाच्या सेवनाने मानवी शरीर आणि वृत्तीत अमूलाग्र बदल घडून आले. रासायनिक पदार्थयुक्त अन्न खाल्याने जनुकीय बदल घडल्याची अनेक उदाहरणे आज समोर येत आहेत. आज संपूर्ण देश पोखरून निघाला आहे. कोणाचेही काम वजन ठेवल्याशिवाय होत नाही. ७-१२ चा उतारा किंवा विविध प्रमाणपत्रे किंवा अनेक राष्ट्रीय कामे, राष्ट्रीय पक्षाची असोत की स्थानिक पक्षांची, पैशाशिवाय होत नाहीत. प्रत्येकाच्या नसानसात भ्रष्टाचार भिनला आहे.

**बायोसॅनिटायझर- जैविक उत्प्रेरक**

वरील सर्व सविस्तर वृत्तांत लिहिण्याचे कारण की, या सर्व प्रक्रियेतून १००-१५० वर्षात सातत्याने निसर्गाचा ऱ्हास एका देशाकडून इतर देशांकडे सरकत जाऊन आज आम्ही ग्लोबल वॉर्मिंगच्या (म्हणजे अत्यंत प्रदूषण युक्त वातावरण) या झटक्यातून सावरण्याची धडपड करीत आहोत. त्या धडपडीची आता अनेक देशांना आवश्यकता असून त्यावरील योग्य उपाय योजना भारतीय शास्त्रज्ञ डॉ. उदय शंकर भवाळकर, केमिकल इंजिनिअर, आय.आय.टी., मुंबई यांनी शोधून काढला आहे. पर्यावरणाची आणि संपूर्ण जगाला पाशवी विळखा घातलेली ग्लोबल वॉर्मिंगची समस्या एका दिवसात निर्माण झाली नाही. परंतु या समस्येचा शोध घेताना डॉ. उदय शंकर भवाळकर यांनी समस्येचे मूळ म्हणजेच 'नायट्रेट्स' आहे हे शोधून काढले आणि त्यावर उपाय शोधताना केवळ कार्बन आणि त्यासंबंधित संशोधन न करता अतिशय वेगळ्या पद्धतीने नायट्रेट्सचे विभाजन करून समस्येचे समाधान शोधले. ज्याचा उपयोग कोणत्याही (लिक्विड) पातळ पदार्थात करण्याची आवश्यकता आहे व एकदाच त्याचा उपयोग करावयाचा आहे. बायोसॅनिटायझर या उत्प्रेरकामुळे संपूर्णतः शुद्धीकरणाची प्रक्रिया सहज साधता येते. पूर्वी आपल्याला मिळालेले निर्मळ वातावरण ही त्यावेळेसच्या नैसर्गिक संपदेमुळे होती. ती आज नसल्यामुळे निर्मितीची शक्ती असणारे हे एक प्रभावी जैविक उत्प्रेरक आहे. एक एकर जंगल जेवढे कार्बन डायऑक्साईड व नायट्रोजन डायऑक्साईड अन्न म्हणून उपयोग करून त्यामोबदल्यात आपणांस शुद्ध प्राणवायूचे वरदान देते, नेमकी तीच प्रक्रिया १०० मि.ली. ग्रॅम बायोसॅनिटायझरच्या वापराने मिळते. ५१ वर्षांपूर्वी एका मोठ्या खोलीत मावेल एवढा संगणक होता तोच आज आमच्या खिशात मावतो आहे. निरंतर संशोधनाने आणि अविश्रांत संशोधनाने बायोसॅनिटायझर या उत्प्रेरकाच्या निर्मितीची नॅनो टेक्नॉलॉजी विकसित करण्यात आली आहे.

**पाण्याची शुद्धता :-** पातळ पदार्थ जसे पाणी, आज पाणी सर्वत्र प्रदूषित आहे. कोणत्याही नदीतील, विहिरीतील, कूपनलिकामधील, मोठ्या जलाशयातील, तलावातील पाणी आज आम्ही पिऊ शकत नाही. पाण्यात मोठ्या प्रमाणात नायट्रेट्स, सॉल्ट्स व अनेक रासायनिक घटक मिसळलेले असल्याने सरळ पिऊ शकत नाही.

**क्रमश :**

प्रा. अरविंद बा. कडबे
अध्यक्ष ओलावा फॉउंडेशन
मो. : ९४२२११२४२०

# ब्रिटीश राजवटीत शैक्षणिक पद भूषविणारे पहिले भारतीय!

## पितामह दादाभाई नौरोजी यांची आज जयंती

भारताचे पितामह म्हणून ओळखले जाणारे दादाभाई नौरोजी हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक थोर राजकारणी, अर्थशास्त्रज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांचा जन्म ४ सप्टेंबर १८२५ रोजी मुंबईतील एका पारशी कुटुंबात झाला होता. ते पितामह या नावाने ओळखले जात असून त्यांचे पूर्ण नाव दादाभाई नौरोजी दोर्दी असे होते. १८९२ मध्ये ब्रिटनच्या हाऊस ऑफ कॉमन्स (फिन्सबरी सेंट्रल) मधून निवडून येणारे ते पहिले भारतीय व आशियाई खासदार ठरले. त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे तीन वेळा अध्यक्षपद भूषवले. १९०६ च्या कलकत्ता अधिवेशनात त्यांनी पहिल्यांदा अधिकृतपणे 'स्वराज्य' ही मागणी पुढे आणली. त्यांनी ब्रिटिशांनी भारताची कशी आर्थिक लूट केली, हे आपल्या ग्रंथातून सिद्ध केले. त्यांचे 'पॉव्हर्टी अँड अन-ब्रिटिश रूल इन इंडिया' हे पुस्तक अतिशय प्रसिद्ध आहे.

नवरोजींच्या सुरुवातीच्या कारकिर्दीत १८७४ मध्ये बडोद्याचे दिवाण म्हणून काम करण्याचा समावेश होता. त्यानंतर, ते इंग्लंडला गेले , जिथे त्यांनी भारतीय हितांचे समर्थन करणे सुरू ठेवले. १८९२ मध्ये, ते लिबरल पक्षाचे खासदार म्हणून हाऊस ऑफ कॉमन्सवर निवडून आले आणि १८९५ पर्यंत फिन्सबरी सेंट्रलचे प्रतिनिधित्व केले. डेव्हिड ऑक्टरलॉनी डाइस सोम्ब्रे , जे एक अँग्लो इंडियन खासदार होते, त्यांच्या नंतर ब्रिटिश खासदार बनणारे ते आशियाई वंशाचे दुसरे व्यक्ती होते.

नवरोजी विशेषतः 'ड्रेन थिअरी' (संपत्तीचा निचरा होण्याचा सिद्धांत) मांडण्यासाठी ओळखले जातात, ज्यानुसार ब्रिटिश राजवटीतील आर्थिक शोषणामुळे भारतातून ब्रिटनकडे संपत्तीचे हस्तांतरण झाले. त्यांनी ही मते त्यांच्या १९०१ च्या 'पॉव्हर्टी अँड अन-ब्रिटिश रुल इन इंडिया' या प्रकाशनात सविस्तरपणे मांडली, ज्यामुळे वसाहतवादी अर्थशास्त्र आणि राजकीय प्रतिनिधित्वावरील उदयोन्मुख चर्चांना हातभार लागला. त्यांचे कार्य सुरुवातीच्या राष्ट्रवाद्यांमध्ये आणि सुधारकांमध्ये प्रभावी होते आणि ते सुरुवातीच्या भारतीय राजकीय विचारांना आकार देणारी एक प्रमुख व्यक्ती राहिले. नवरोजींनी आंतरराष्ट्रीय समाजवादी नेटवर्कमध्येही भाग घेतला आणि कार्ल कौत्स्की आणि जॉर्जी प्लेखानोव्ह यांसारख्या व्यक्तींसोबत ते 'सेकंड इंटरनॅशनल'चे सदस्य होते. नवरोजींनी स्वतः मध्यम भूमिका राखली असली तरी, आंतरराष्ट्रीय राजकीय गटांसोबतच्या त्यांच्या सहभागातून कामगार, साम्राज्य आणि जागतिक असमानतेच्या मुद्द्यांबद्दलची त्यांची व्यापक चिंता दिसून येते. नंतरच्या काळात, नवरोजींना भारत आणि युनायटेड किंगडम या दोन्ही देशांमध्ये मरणोत्तर मान्यता मिळाली. २०१४ मध्ये, ब्रिटिश सरकारने यूके-भारत संबंधांमधील योगदानाचा सन्मान करण्यासाठी दादाभाई नवरोजी पुरस्कार सुरू केले, जे तत्कालीन उपपंतप्रधान निक क्लेग यांनी सुरू केले होते. इंडिया पोस्टने १९६३, १९९७ आणि २०१७ मध्ये टपाल तिकिटे जारी करून त्यांचे स्मरण केले. भारतीय राष्ट्रवाद, वसाहतवादी टीका आणि ब्रिटिश राजकारणातील आशियाई सहभागाच्या सुरुवातीच्या इतिहासाच्या संदर्भात त्यांच्या वारशाचा अभ्यास सुरू आहे.



अथोर्नन (दीक्षित पुजारी) असल्याने, नवरोजींनी झोरोस्ट्रियन धर्माला त्याच्या मूळ शुद्धता आणि साधेपणात पुनर्संचयित करण्यासाठी १ ऑगस्ट १८५१ रोजी रहनुमाई मजदायसन सभा (मजदायस्ने मार्गावरील मार्गदर्शक) ची स्थापना केली . १८५४ मध्ये, त्यांनी झोरोस्ट्रियन संकल्पना स्पष्ट करण्यासाठी आणि पारसी सामाजिक सुधारणांना प्रोत्साहन देण्यासाठी रास्त गोफ्तार (सत्य सांगणारा) नावाचे एक गुजराती पाक्षिक प्रकाशन देखील सुरू केले. याच सुमारास, त्यांनी 'द व्हॉइस ऑफ इंडिया' नावाचे आणखी एक वृत्तपत्र प्रकाशित केले . डिसेंबर १८५५ मध्ये, त्यांची मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये गणित आणि नैसर्गिक तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली, आणि असे शैक्षणिक पद भूषवणारे ते पहिले भारतीय ठरले. १८५५ मध्ये ते कामा अँड कंपनीमध्ये भागीदार होण्यासाठी लंडनला गेले आणि ब्रिटनमध्ये स्थापन होणाऱ्या पहिल्या भारतीय कंपनीसाठी लिव्हरपूलमध्ये एक शाखा उघडली . तीन वर्षांच्या आत, त्यांनी नैतिक कारणास्तव राजीनामा दिला. १८५९ मध्ये, त्यांनी स्वतःची कापूस व्यापार कंपनी , दादाभाई नवरोजी अँड कंपनी स्थापन केली. १८६१ मध्ये त्यांनी मुंचर्जी होर्मुसजी कामा यांच्यासोबत युरोपच्या झोरोस्ट्रियन ट्रस्ट फंडाची स्थापना केली . १८६७ मध्ये, त्यांनी ईस्ट इंडिया असोसिएशनची स्थापना करण्यासही मदत केली , जी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पूर्ववर्ती संघटनांपैकी एक होती आणि ब्रिटिश जनतेसमोर भारतीय दृष्टिकोन मांडण्याचे तिचे उद्दिष्ट होते. लंडनच्या एथनोलॉजिकल सोसायटीच्या प्रचाराला प्रत्युत्तर देण्यात या असोसिएशनने महत्त्वाची भूमिका बजावली , ज्या सोसायटीने १८६६ च्या अधिवेशनात आशियाई लोकांची युरोपियन लोकांपेक्षा हीनता सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. या असोसिएशनने लवकरच प्रतिष्ठित इंग्रजांचा पाठिंबा मिळवला आणि ब्रिटिश संसदेत लक्षणीय प्रभाव पाडण्यास ती सक्षम झाली . या संघटनेच्या लवकरच मुंबई, कोलकाता आणि चेन्नई येथे शाखा उघडल्या. १८७४ मध्ये ते बडोद्याचे पंतप्रधान झाले आणि मुंबईच्या विधान परिषदेचे सदस्य होते.

**वैयक्तिक जीवन आणि मृत्यू**

वयाच्या ११ व्या वर्षी त्यांचा विवाह गुलबाई यांच्याशी झाला. ३० जून १९१७ रोजी, वयाच्या ९१ व्या वर्षी मुंबईत त्यांचे निधन झाले. मुंबईतील एक वारसा रस्ता असलेल्या दादाभाई नवरोजी रोडला त्यांचे नाव देण्यात आले आहे, तसेच पाकिस्तानमधील कराची येथील दादाभाई नवरोजी रोड आणि लंडनच्या फिन्सबरी भागातील नवरोजी स्ट्रीट यांनाही त्यांचे नाव देण्यात आले आहे. दिल्लीच्या दक्षिणेकडील केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या एका प्रमुख निवासी वसाहतीचे नाव देखील नवरोजी नगर आहे. त्यांच्या नाती, पेरिन आणि खुर्शीदबेन , यादेखील स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होत्या. १९३० मध्ये, अहमदाबादमधील एका सरकारी महाविद्यालयात भारतीय ध्वज फडकवण्याचा प्रयत्न केल्याबद्दल खुर्शीदबेन यांना इतर क्रांतिकारकांसह अटक करण्यात आली होती.

.............

**निचरा सिद्धांत आणि गरिबी**

नौरोजींचे कार्य भारतातील ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतातून ब्रिटनकडे झालेल्या संपत्तीच्या गळतीवर केंद्रित होते . ड्रेन सिद्धांताचे श्रेय नौरोजींना देण्यामागील एक कारण म्हणजे त्यांनी भारताच्या निव्वळ राष्ट्रीय नफ्याचा अंदाज लावण्याचा घेतलेला निर्णय आणि त्याद्वारे, वसाहतवादी राजवटीचा देशावर झालेला परिणाम. अर्थशास्त्रातील आपल्या कार्याद्वारे, नौरोजींनी हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की ब्रिटन भारतातून पैशांची गळती करत होते.

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com



# पंचायतराज समितीकडून पातूर तालुक्यातील विकासकामांची झाडाझडती

## जीर्ण इमारतीबाबत तीव्र नाराजी

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**पातूर** : अकोला जिल्ह्याच्या दोन दिवसीय दौऱ्यावर आलेल्या पंचायतराज समितीच्या पथकाने गुरुवारी पातूर तालुक्याला भेट देऊन विविध विकासकामे, ग्रामपंचायतींचे दस्तऐवज आणि पंचायत समितीच्या प्रशासकीय कारभाराची प्रत्यक्ष पाहणी केली. गेल्या काही वर्षांत तालुक्यात झालेल्या कामांचा आणि प्रशासकीय पारदर्शकतेचा आढावा घेण्याच्या दृष्टीने हा दौरा अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

बाबुळगाव ग्रामपंचायतीत दस्तऐवजांची तपासणी

पंचायतराज समितीच्या या गटाचे नेतृत्व आमदार विक्रम काळे यांनी केले असून, समितीमध्ये आमदार जयंत आजगावकर व आमदार किरण लहामटे यांचा सदस्य म्हणून समावेश होता. समितीने सर्वप्रथम बाबुळगाव ग्रामपंचायतीला भेट दिली. तेथे ग्रामपंचायतीच्या विविध नोंदी, शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि विकासकामांच्या कागदपत्रांची बारकाईने पाहणी केली.

जीर्ण इमारतीबाबत राज्य शासनाकडे शिफारस करणार

त्यानंतर समितीने पातूर पंचायत समिती कार्यालयाला भेट देऊन विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. पाहणीदरम्यान पंचायत समितीची प्रशासकीय इमारत अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेत असल्याचे समोर आले. अशा धोकादायक इमारतीत प्रशासकीय कारभार सुरू असल्याबद्दल समितीचे गटप्रमुख आमदार विक्रम काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या इमारतीच्या नूतनीकरणाबाबत व नवीन प्रश्नाबाबत राज्य शासनाकडे विशेष शिफारस करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### शुक्रवारी मांडला जाणार लेखापरीक्षण अहवाल

» दरम्यान, पातूर पंचायत समितीच्या संपूर्ण कामकाजाचा लेखापरीक्षण (ऑडिट) अहवाल शुक्रवारी जिल्हा परिषदेत आयोजित विशेष सभेत सादर केला जाणार आहे. या अहवालाच्या आधारे पंचायतराज समिती पुढील दिशा ठरवणार असल्याने, तालुक्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसह नागरिकांचेही या सभेकडे लक्ष लागले आहे. या पाहणी दौऱ्याप्रसंगी पातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (BDO), कृषी अधिकारी, विविध ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक तसेच विविध विभागांचे प्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### त्रुटींच्या पूर्ततेसाठी अधिकाऱ्यांना मुदत

» समितीने ग्रामसेवक, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामकाजाची झाडाझडती घेतली. पाहणीदरम्यान ज्या त्रुटी आढळून आल्या, त्यांची तातडीने पूर्तता करून आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी संबंधित अधिकारी, कर्मचारी व ग्रामसेवकांना समितीने विशेष मुदत दिली आहे.

# खासगी वाहने तसेच नगरपरिषदेच्या घंटागाडीला मेमो

## 'सिटी न्यूज'च्या मुद्द्याची RTO कडून दखल

निखिल टिकले ४ सप्टेंबर

**अकोट** : खासगी वाहनांना नियमभंगाबाबत मेमो देऊन कारवाई सुरू असताना, शासकीय यंत्रणेत असलेल्या वाहनांवरही अशीच कारवाई केली जाते का? असा थेट सवाल सिटी न्यूज प्रतिनिधीने RTO अधिकारी क्षितिज व्यवहारे, IMV, अकोला यांच्या समोर उपस्थित केला.

खासगी वाहनावर मेमो देण्याची कारवाई सुरू असतानाच झालेल्या या प्रत्यक्ष चर्चेत, नगरपरिषदेच्या वाहनांसह इतर शासकीय वाहनांचीही फिटनेस, विमा, PUC आणि आवश्यक कागदपत्रांच्या आधारे तपासणी करून नियमभंग आढळल्यास कारवाई व्हावी, असा मुद्दा मांडण्यात आला.

या चर्चेनंतर नगरपरिषद अकोटच्या एका घंटागाडीला RTO विभागाकडून 9000 रुपयांचा मेमो देण्यात आला. त्यामुळे सिटी न्यूजने उपस्थित केलेल्या मुद्द्यानंतर शासकीय वाहनावरही कारवाई झाल्याचे समोर आले आहे.

मात्र, या कारवाईनंतर नगरपरिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासकीय वाहन रस्त्यावर धावत असताना त्याची आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी कोणाची?

आता महत्त्वाचा प्रश्न म्हणजे—या मेमोचा दंड कोण भरणार? संबंधित जबाबदारांकडून त्याची वसुली होणार की जनतेच्या करातून मिळणाऱ्या पैशातून पुन्हा हा भुर्दंड भरला जाणार? खासगी असो वा शासकीय—नियम सर्वांसाठी समान असतील, तर कारवाईही समान असावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### एकीकडे कारवाई, तर दुसरीकडे सूट?

प्रतिनिधी ३ सप्टेंबर

**अकोट** : अकोट शहरात RTOकडून वाहनांची तपासणी व कारवाई केली जात असताना सर्व वाहनांसाठी समान नियम लागू केले जातात का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. एखाद्या वाहनाची तपासणी करून कारवाई केली जाते; मात्र शहरातून नियमितपणे धावणाऱ्या गिट्टी, सँड क्रशर व इतर बांधकाम साहित्य वाहून नेणाऱ्या ओव्हरलोड वाहनांवरही अशीच तत्परता दाखवली जाते का, हा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला



गिट्टी-सँड क्रश वाहून नेणाऱ्या ओव्हरलोड वाहनांवर कारवाई कधी?

समान असतील, तर कारवाईही समान निकषाने व्हायला नको का? एखाद्या वाहनावर कारवाई आणि दुसरीकडे नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र असेल, तर




# एक महिन्यापासून बेपत्ता महिलेचा शोध घेण्यात पोलिसांना अपयश

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**हिवरखेड** : हिंगणी बु. येथील सौ. उषा सुधाकर जवंजाळ ही साठ वर्षीय महिला १ ऑगस्ट पासून बेपत्ता झाली आहे. त्याच दिवशी सदरहू महिलेचा मुलगा रोशन सुधाकर जवंजाळ याने पोलीस स्टेशन हिवरखेडला तक्रार नोंदवली. अजून पावेतो ही महिला बेपत्ता असून तिचा शोध घेण्यात पोलीस खात्याला यश आले नाही.

कुणाला काही न सांगता ही महिला निघून गेल्याने व अद्यापपर्यंत तिचा शोध न लागल्याने तिचे पती रामदास जवंजाळ व मुलगा काळजीत पडले आहेत. सदरहू महिलेच्या बेपत्ता होण्याबाबत सोशल मीडियावर सुद्धा छायाचित्रासहीत बेपत्ता असल्याचे व दिसल्यास संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या महिलेला एक विवाहित मुलगी व एक अविवाहीत मुलगा असून सर्व नातेवाईकांकडे विचारपूस करण्यात आली पण सगळ्यांनी नकारार्थी उत्तर दिले. घटना घडली त्या दिवशी सदरहू महिला घरी एकटीच होती तर तिचे पती आणि मुलगा गजानन महाराज मंदिर शेगावला सेवाधारी म्हणून काम करत होते. हिवरखेड पोलीस स्टेशनशी प्रत्यक्ष जाऊन संपर्क साधला असता आमची चौकशी सुरु असून तुम्ही आजूबाजूच्या विहिरी, तलाव, नद्या याठिकाणी पहा व प्रत्येक गावात, शहरात, रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड या सार्वजनिक ठिकाणी माहिती पत्रके चिपकवा तसेच रात्री दहा च्या पुढे रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड इत्यादी सार्वजनिक ठिकाणी तिचा शोध घ्या असा अफलातून सल्ला हिंगणी बु. चे बिट जमदार यांनी दिला. रामदास जवंजाळ हे भूमिहीन,गरीब व अल्पशिक्षित असून पोलिसांच्या या सल्ल्याने ते हादरले आहेत.

# महिलेला धमकी देऊन अत्याचार करणारा आरोपी अटकेत



प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**हिवरखेड** : पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्राम दानापूर येथील एका महिलेची ईस्टाग्रामवर मैत्री करून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवणाऱ्या आरोपीला हिवरखेड पोलिसांनी जेरबंद केले. त्याच्या विरुद्ध (६४),२(एम) ७७,७८, ३५१(३) ६६(e), नुसार गुन्हा दाखल केला.

फिर्यादी दानापूर येथील महिलेच्या तक्रारीवरून आरोपी शेख साहिल शेख साबीर याने महिलेशी मैत्री करून महिलेला धमकी देऊन वेळोवेळी शारिरिक संबंध प्रस्तापित करीत होता. महिलेने सबंध ठेवण्यास नकार दिला तर आरोपीने महिलेला तुझे अश्लिल फोटो, व्हिडिओ व्हायरल करणार, हाताची नस कापणार, तुझ्या नवऱ्याला मारणार अशा धमक्या महिलेला देऊन महिलेवर जबरदस्तीने सबंध करायचा. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी शेख साहिल शेख साबीर, जैनपूर ता. दर्यापूर याला ताब्यात घेऊन बी एन एस अंतर्गत गुन्हा दाखल केला.

# सुपीनाथ नगरात तणनाशक फवारणी डास नियंत्रणासाठी नगरपरिषदेची मोहीम

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**तेल्हारा** : सुपीनाथ नगर परिसरात आज नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीने तणनाशक फवारणी करण्यात आली. परिसरातील वाढलेले गवत, झाडे-झुडपे व अस्वच्छतेमुळे डास, माशा व इतर कीटकांचा प्रादुर्भाव वाढू नये, यासाठी नगरपरिषदेकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

येत्या काळात डास व माशांवर नियंत्रण मिळविण्यासाठी औषध फवारणी करण्यात येणार आहे. दरम्यान, सुपीनाथ नगरातील सर्व वैयक्तिक प्लॉटधारकांनी आपल्या प्लॉटमधील वाढलेले गवत, झाडे-झुडपे व कचरा तातडीने साफ करून घ्यावा, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

प्लॉटमध्ये झाडे-झुडपे व अस्वच्छता आढळून आल्यास आणि त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित प्लॉटधारकांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

नागरिकांनी आपला परिसर स्वच्छ ठेवून डास व रोगराईचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नगरपरिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**सतीश रमेश जयस्वाल**
सभापती,
आरोग्य व स्वच्छता समिती
नगर परिषद, तेल्हारा

## अडगाव बु. येथे विशेष ग्रामसभा उत्साहात



प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अडगांव बु** : येथील ग्रामपंचायत कार्यालयात ३१ ऑगस्ट रोजी विशेष ग्रामसभा शांततापूर्ण वातावरणात पार पडली. या सभेत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत 'आवास प्लस २०२४' टप्पा दोनच्या सर्वेक्षणातील नवीन लाभार्थी यादीचे वाचन करण्यात आले.

ग्रामसेवक संघटनेच्या ग्रामसभेवरील बहिष्काराच्या पार्श्वभूमीवर, ग्रामपंचायतीचे वसुली लिपिक शेख जमीर यांनी सचिवपदाची धुरा सांभाळत सभेची संपूर्ण प्रक्रिया सुरळीत पार पाडली.

या महत्त्वपूर्ण बैठकीस प्रशासक शोभा खंडारे, संजय राजनकर व प्रशासकीय सदस्य, तलाठी प्रवीण देशमुख, शिक्षक, अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील हितेश हागे, पत्रकार मंडळी तसेच गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

# प्रा. डॉ. जयश्री देशमुख यांना 'उत्कृष्ट प्राध्यापक' राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**वाशीम:** वाशीम येथील श्री रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. जयश्री पद्मराव देशमुख यांना राष्ट्रीय स्तरावरील मूल्यांकनाद्वारे प्रदान करण्यात येणारा 'उत्कृष्ट प्राध्यापक' हा प्रतिष्ठित राष्ट्रीय बहुमान प्राप्त झाला आहे. पुणे येथील संगमवाडी भागातील पंचरत्न सभागृहात 'प्रतिष्ठान कला आणि संस्कृती' संस्थेतर्फे आयोजित भव्य कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

अकोल्याच्या रहिवासी असलेल्या प्रा. डॉ. जयश्री देशमुख यांना शिक्षण व अध्यापन क्षेत्रातील तब्बल ३१ वर्षांचा दांडगा अनुभव आहे. श्री रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयात त्यांनी १८ वर्षे प्राचार्य म्हणून यशस्वी धुरा सांभाळली असून, सध्या त्या याच महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करत आहेत. त्यांचे शिक्षण ँ.एम्., ँ.E., श्.एँ.. झाले असून त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून (्ण्श्ध्ळ) समाजकार्य विषयात विद्यावाचस्पती (इ्.D.) पदवी संपादन केली आहे. 'पश्चिम विदर्भातील मथुरा बंजारा समाजातील नायकांच्या भूमिकेचे विश्लेषणात्मक अध्ययन' हा त्यांच्या संशोधनाचा मुख्य विषय होता. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये त्यांचे १०० हून अधिक संशोधनपर लेख प्रकाशित झाले आहेत. त्यांनी लिहिलेल्या ४ पुस्तकांना वाचकांचा व अभ्यासकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. देश-विदेशातील अनेक महत्त्वाच्या शैक्षणिक परिषदांमध्ये त्यांचा सक्रिय व उल्लेखनीय सहभाग राहिला आहे.

आपल्या या यशाचे श्रेय व्यक्त करताना डॉ. जयश्री देशमुख म्हणाल्या की, 'श्री रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालयाचे संस्थापक स्वर्गीय आप्पासाहेब सरनाईक, स्वर्गीय मालतीबाई सरनाईक, शिक्षक आमदार ॲड. किरणराव सरनाईक व संपूर्ण सरनाईक परिवार, तसेच माझे वडील स्वर्गीय ॲड. पदमराव देशमुख, पती ॲड. कृष्णराव देशमुख, भाऊ ॲड. राजेश जाधव, संजय देशमुख, महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक, कर्मचारी आणि माहेर-सासरच्या नातेवाईकांच्या खंबीर पाठिंब्यामुळेच मी हा टप्पा गाठू शकले.' त्यांना मिळालेल्या या राष्ट्रीय पुरस्कारामुळे शैक्षणिक, सामाजिक आणि पत्रकारिता वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## हवामान बदलाचे संकट आणि त्याचे परिणाम

**अकोला :** जागतिक पातळीवर वेगाने होणाऱ्या हवामान बदलामुळे आता स्थानिक पातळीवरही त्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. ऋतूचक्रामध्ये झालेला मोठा बदल, कधी अवेळी मुसळधार पाऊस, तर कधी तीव्र दुष्काळ यांमुळे शेती आणि मानवी जीवनावर मोठा परिणाम होत आहे.जागतिक तापमानात सातत्याने होत असलेल्या वाढीमुळे उन्हाळ्यातील झळा दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहेत. अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे पिकांचे मोठे नुकसान होत असून शेतकरी संकटात सापडले आहेत. अतिवृष्टी, पूर आणि ढगफुटीसारख्या घटनांचे प्रमाण वाढले आहे.पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवणे, वृक्षारोपण करणे आणि प्लास्टिकचा वापर टाळणे यांसारखे उपाय राबवणे आवश्यक आहे.

# पंचायत राज समिती सदस्यांकडून नमो उद्यानाची पाहणी

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**मुर्तिजापूर** : संत श्री गाडगे महाराज यांच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या मुर्तिजापूरच्या भूमीवर 'नमो उद्यानचे काम पूर्णत्वास आले असून, शहराच्या सौंदर्यात त्यामुळे भर पडणार आहे. आमदार हरीश पिंपळे यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या या उद्यानाला महाराष्ट्र विधिमंडळ पंचायत राज समितीच्या प्रमुखांसह समितीतील आमदारांनी सदिच्छा भेट देत कामाची पाहणी केली.

समितीचे प्रमुख आमदार संतोष रावसाहेब दानवे यांच्यासह आमदार दीपक केसरकर, संजय मेश्राम, नितीन देशमुख, विक्रम काळे, डॉ. किरण लहाने आणि प्रा. रमेश बोरनारे यांनी उद्यानाची पाहणी केली.

यावेळी आमदार हरीश पिंपळे उपस्थित होते. त्यांनी उद्यानाची संकल्पना, करण्यात आलेली विकासकामे तसेच नागरिकांसाठी उपलब्ध होणाऱ्या सुविधांची माहिती समितीच्या सदस्यांना दिली.



### नागरिकांसाठी सुंदर सार्वजनिक स्थळ

'नमो उद्याना'मुळे मुर्तिजापूरच्या सौंदर्यात भर पडण्यासोबतच नागरिकांना विरंगुळा व सार्वजनिक उपक्रमांसाठी एक सुंदर ठिकाण उपलब्ध होणार आहे. मतदारसंघाच्या विकासासाठी विविध कामांचा सातत्याने पाठपुरावा सुरू असून, नागरिकांना दर्जेदार सुविधा देण्याचा प्रयत्न असल्याचे आमदार पिंपळे यांनी सांगितले.

## गुडधी रेल्वेगेटजवळील गतिरोधक धोकादायक

**अकोला** : उमरी मार्गे गुडधी जाताना गुडधी रेल्वेगेट जवळ बसविण्यात आलेल्या गतिरोधकाची उंची जास्त असल्यामुळे दुचाकी व स्कूटर वाहनांना मोठी अडचण जात आहे. या ठिकाणी अचानक दुचाकी वाहन थांबत असल्याने वाहनावरील नियंत्रण सुटून किरकोळ अपघात घडत आहेत. याचा सर्वाधिक त्रास महिला व युवतींना होत असल्याने या गतिरोधकाची उंची कमी करण्याची मागणी वाहनधारकांमधून होत आहे.

या भागात रहदारी वाढली आहे, त्यामुळे गतिरोधक व्यवस्थीत असणे आवश्यक आहे. या समस्येकडे या भागातील नागरिकांनी लक्ष वेधले आहे.

## दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलातर्फे

# गरजू दिव्यांगांना व्हीलचेअरचे वितरण

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अकोला** : स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या माध्यमाने डॉ.विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात विविध सामाजिक उपक्रम संपूर्ण भारतभर निरंतर राबवले जात आहेत . दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे दि.३ सप्टेंबर २०२६ रोजी अकोटच्या ५ गरजू दिव्यांगांना व्हीलचेअरचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

श्री गजानन महाराज मंदिर मुकुंद नगर येथील संस्थेच्या कार्यक्रमात सुमेरमा फाउंडेशनच्या डॉ.पूजा खेतान , आय एम एचे डॉ.संतोषकुमार सोमानी ,



डॉ.योगिता चव्हाण , गजानन महाराज संस्थानचे श्री.गजानन पांडे , प्रा.संजय काळे व दिव्यांग सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.विशाल कोरडे उपस्थित होते . दिव्यांग सोशल फाउंडेशन ला कोणतेही शासकीय अनुदान मिळत नसल्याने अशा उपक्रमासाठी दानदात्यांकडून होणारे आर्थिक सहकार्य व दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोलाच्या सदस्यांनी केलेल्या दानातून दिव्यांगांना व्हीलचेअर, ब्रेल बुक्स, व्हाईटकेन व शिष्यवृत्ती प्रदान केली जाते .

सदर उपक्रमासाठी इनर व्हील क्लब ऑफ अकोला क्वीन्स , डॉ.पल्लवी दिवेकर , सुमिरमा फाउंडेशनच्या डॉ.पूजा खेतान , डॉ.योगिता चव्हाण , डॉ.संतोषकुमार सोमानी , चेतन नारखेडे , अतुल शंकरवार , नीता वायकोळे , अनुराधा साठे व डॉ.भारती मुठाळ यांचे सहकार्य लाभले . दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे नेहमीच आम्हाला मदत केली जात असून आज व्हीलचेअर मिळाल्यामुळे आमचे जीवन सहज व सुकर होईल अशी प्रतिक्रिया लाभार्थी दिव्यांगांनी व्यक्त केली . येणाऱ्या दिवाळीत दिव्यांग बांधवांसाठी संस्थेतर्फे रोजगार उपक्रम राबवले जाणार असून ज्या दिव्यांगांना सहभाग नोंदवायचा आहे त्यांनी संस्थेच्या ९४२३६५००९० या हेल्पलाइन क्रमांकावर नोंदणी करावी अशी माहिती विजय कोरडे यांनी दिली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६

https://epaper.citynewssuperfast.com

# 9 सप्टेंबरला होणार सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत

## ओबीसी व खुल्या प्रवर्गाच्या आरक्षणात बदल

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमधील सरपंच पदाचे एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या घटनात्मक मर्यादेपेक्षा जास्त झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर, ग्रामविकास विभागाच्या सूचनेनुसार त्यात सुधारणा केली जाणार आहे.

यानुसार नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) आणि खुला प्रवर्ग (महिलांसह) तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींसाठी सोमवार, ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता तालुका स्तरावर सुधारित सोडतीचे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामविकास विभागाने दिलेल्या आदेशानुसार, १३ जून २०२५ रोजी जाहीर झालेल्या अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गाच्या आरक्षणात कोणताही बदल होणार नाही.

केवळ १२ ऑगस्ट २०२६ च्या शुध्दीपत्रकान्वये ओबीसी व सर्वसाधारण (खुला) प्रवर्गातील महिला व पुरुषांच्या आरक्षणाची पुनर्रचना केली जाणार आहे.

**तालुकानिहाय अधिकारी आणि ठिकाण :** सोमवार, ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता संबंधित सर्व तहसील कार्यालयांच्या सभागृहात प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत होईल.

उपविभागीय अधिकारी (SDO) व उपजिल्हाधिकारी या प्रक्रियेवर नियंत्रण अधिकारी म्हणून उपस्थित राहतील. यवतमाळ, बाभूळगाव, आर्णी, दारव्हा, नेर, पुसद, दिग्रस, उमरखेड, महागाव, राळेगाव, कळंब, मारेगाव व घाटंजी या १३ तालुक्यांमध्ये ही सोडत पार पडेल.

**'या' चार तालुक्यांना दिलासा : आरक्षणात बदल नाही** - प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, दारव्हा, केळापूर, झरीजामणी आणि वणी या चार तालुक्यांमध्ये एकूण आरक्षणाची टक्केवारी आधीच ५० टक्क्यांच्या मर्यादेत आहे. त्यामुळे या तालुक्यांमध्ये सुधारित आरक्षण काढण्याची गरज नाही.

**४० नवनिर्मित ग्रामपंचायतींचे चित्र स्पष्ट :** जिल्ह्यातील नव्याने स्थापन झालेल्या ४० ग्रामपंचायतींमधील सरपंच पदांचे आरक्षण पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी निश्चित करण्यात आले आहे.

अनुसूचित जाती : ६ (महिला ४) अनुसूचित जमाती : १२ (महिला ६) नागरिकांचा मागास प्रवर्ग (OBC) : ५ (महिला ३) सर्वसाधारण (खुला) : १७ (महिला ९)

**नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन :** आरक्षण निश्चितीची ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने पार पाडली जाणार आहे. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतींचे आजी-माजी सदस्य, लोकप्रतिनिधी व नागरिकांनी ९ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता आपापल्या तहसील कार्यालयात उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## पांढरकवडा तालुका काँग्रेस कमेटीची आढावा बैठक

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**पांढरकवडा :** तालुका काँग्रेस कमेटीच्या वतीने पक्ष संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत अध्यक्ष स्थानी तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रेमराव राठोड होते तर प्रमुख उपस्थिती पक्ष निरीक्षक ॲड. वासिम अहेमद उपाध्यक्ष जिल्हा काँग्रेस कॅमेटी, डॉ. भावराव कावडे सरचिटणीस जिल्हा काँग्रेस, झिया शेख पुसद काँग्रेस अध्यक्ष हे होते. आगामी काळातील पक्ष संघटन मजबूत करण्यासह विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीमध्ये ७ सप्टेंबरला जिल्हा काँग्रेस कमेटी येथे आयोजित जनता दरबार विषयी माहिती, तसेच बूथनिहाय पक्ष संघटन, मतदारांशी संपर्क वाढविणे, शासनाच्या विविध योजनांची जनजागृती करणे तसेच नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविण्याबाबत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी काँग्रेस पक्षाची विचारधारा व संविधानिक मूल्ये जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच आगामी कार्यक्रमांचे नियोजन करून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. बैठकीचा समारोप आगामी काळात काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवून जनतेच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे लढा देण्याचा निर्धार व्यक्त करून करण्यात आला.

# नबाबपूरचे ३३ केव्ही उपकेंद्र सुरु; ६०० कृषी ग्राहकांना दिलासा





प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते उद्घाटन; पाच कोटींच्या निधीतून उभारणी**

**यवतमाळ :** नेर तालुक्यातील नबाबपूर येथील महावितरणचे ३३/११ केव्ही उपकेंद्र कार्यान्वित झाले असून, पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते गुरुवारी या उपकेंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या पाच कोटी रुपयांच्या निधीतून हे उपकेंद्र उभारण्यात आले आहे. या उपकेंद्रामुळे परिसरातील सुमारे ६०० कृषी वीज ग्राहकांना योग्य दाबाचा आणि अधिक स्थिर वीजपुरवठा मिळणार आहे.

बानगाव, चिचगाव, फत्तेपूर आणि उदापूर या गावांतील कृषी पंपांची संख्या तसेच विद्युत भार सातत्याने वाढत असल्याने शिरजगाव उपकेंद्रावर अतिरिक्त ताण निर्माण झाला होता. परिणामी कृषी ग्राहकांना अपेक्षित दाबाने वीजपुरवठा मिळण्यात अडचणी येत होत्या. शेतीच्या हंगामात या समस्येचा मोठा परिणाम शेतकऱ्यांना सहन करावा लागत होता.

नबाबपूर उपकेंद्र सुरू झाल्याने शिरजगाव उपकेंद्रावरील अतिरिक्त भार कमी होणार आहे. त्यामुळे बानगाव, चिचगाव, फत्तेपूर आणि उदापूर परिसरातील वीजपुरवठा अधिक स्थिर होण्यास मदत होणार असून, सुमारे ६०० कृषी ग्राहकांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे.

**पालकमंत्र्यांच्या पुढाकारातून निधी :** नबाबपूर उपकेंद्रासाठी सन २०२४-२५ मध्ये जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या माध्यमातून पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. पालकमंत्री संजय राठोड यांच्या विशेष पुढाकारामुळे हे काम पूर्णत्वास आले. उपकेंद्र कार्यान्वित झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेला गुणवत्तापूर्ण आणि विश्वासार्ह वीजपुरवठा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पालकमंत्र्यांच्या निर्देशानुसार महावितरण प्रशासनाने उपकेंद्राचे काम गतीने पूर्ण केले. यावेळी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# तीन कोटींच्या फसवणुक; फरार आरोपी मुंबईत जेरबंद

## कमी दरात सिमेंट, स्टील, साखर देण्याचे आमिष; एलसीबीची कारवाई

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**उमरखेड :** बाजारभावापेक्षा कमी दरात सिमेंट, स्टील व साखर उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवत सात व्यापाऱ्यांची तब्बल ३ कोटी ६८ लाख ६८ हजार १०२ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने मुंबईतून ताब्यात घेतले.

रामेश्वर केशव कुऱ्हाडे (३२, रा. तरोडा, ता. उमरखेड), असे ताब्यात घेतलेल्या आर. के. एंटरप्रायजेसच्या मालकाचे नाव आहे.

कमी दरात सिमेंट, स्टील व साखर उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवत कुऱ्हाडे याने विविध व्यापाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम घेतल्याचा आरोप आहे. मात्र, त्यानंतर व्यवहार पूर्ण न करता सात व्यापाऱ्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार पोलिसांकडे दाखल झाली होती. या प्रकरणी पोफाळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाला होता. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू असताना प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला. दरम्यान, आरोपी मुंबईत असल्याची माहिती एलसीबीच्या पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने कारवाई करून ३१ ऑगस्ट रोजी मुंबईतून कुऱ्हाडे याला ताब्यात घेतले.

त्यानंतर आरोपीला उमरखेड येथे आणण्यात आले. रात्री उशिरा सुमारे आठ वाजता त्याला न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपीला ३ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेचे फौजदार अमोल राठोड करीत आहेत.

# महिला खेळाडूंना क्रीडा पोशाखाचे वितरण

## बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालयात क्रीडा दिन

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**घाटंजी :** पारवा येथील बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालयात शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महिला खेळाडूंना क्रीडा पोशाखाचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे होते. प्रमुख अतिथी म्हणून इंग्रजी विभागप्रमुख तथा आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. संदीप अग्रवाल, तर शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागप्रमुख डॉ. अभय चांदेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर आचल वाढई व ऐश्वर्या गंध श्रीवार यांनी स्वागतगीत सादर केले. पाहुण्यांचे स्वागत झाल्यानंतर डॉ. अभय चांदेकर यांनी प्रास्ताविकातून मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देत राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्त्व विशद केले.

यावेळी अश्विनी पेटकुले, हर्षदा मोहुर्ले, यतीका प्रधान आणि अर्चना आत्राम यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या जीवनातील खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख अतिथी डॉ. संदीप अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही योगदान द्यावे, असे आवाहन केले.

महिला खेळाडूंना यावेळी क्रीडा पोशाखाचे वितरण करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे यांनी मेजर ध्यानचंद यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थ्यांनी अधिकाधिक क्रीडा प्रकारांत सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात राष्ट्रीय क्रीडा दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

## अनुसूचित जाती विद्यार्थ्यांसाठी ५ सप्टेंबरला कार्यशाळा

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**यवतमाळ :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, स्वाधार योजना व वसतीगृह प्रवेशाबाबत येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी तसेच मार्गदर्शन करण्यासाठी दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता सर विश्वेश्वरया सभागृह, शासकीय तंत्रनिकेतन, धामणगाव रोड, यवतमाळ येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त मंगला मून ह्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. असे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे.

## महागाव तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदी जयश्री नरवाडे

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**महागाव :** महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटीच्या मान्यतेनुसार जयश्री नरवाडे यांची महागाव तालुका/ग्रामीण महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र यवतमाळ जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सौ. वंदना पुरुषोत्तम आवारी यांनी दिले आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे ध्येय व धोरण जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासोबतच पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी काम करण्याची जबाबदारी नरवाडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. तसेच राष्ट्रीय नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची विचारधारा अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा नियुक्तीपत्रातून व्यक्त करण्यात आली आहे.

महागाव तालुक्यात काँग्रेस पक्षाला अधिकाधिक जनाधार मिळवून देण्यासाठी तसेच महिला काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी प्रभावीपणे कार्य करणार असल्याचे नरवाडे यांनी सांगितले. या नियुक्तीबद्दल काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून जयश्री नरवाडे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# कायदा-सुव्यवस्थेसाठी प्रभावी कामगिरी; ठाणेदार वानखेडे यांचा सत्कार

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**महागाव :** शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी प्रभावी कामगिरी करणारे महागाव पोलिस ठाण्याचे ठाणेदार सदानंद वानखेडे यांचा जन आंदोलन आधार संघर्ष समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

समितीच्या शिष्टमंडळाने ठाणेदार वानखेडे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. शहरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिस प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचे शिष्टमंडळाने कौतुक केले.

दरम्यान, महागाव शहरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत यावेळी सविस्तर चर्चा झाली. शहरात नियमित आणि प्रभावी रात्रीची गस्त वाढविण्यासह नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी शिष्टमंडळाने केली. कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या प्रवृत्तींवर पोलिस प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

यावेळी जन आंदोलन आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे, सत्य साई समितीचे तालुकाध्यक्ष डॉ. भेंडे, सुधीर पोदुटवार, डॉ. बेलगमवार, समिती सदस्य सुदाम खंदारे, चेतन चौरे, वैद्यकीय कर्मचारी राहुल जाधव, गजानन मोरे व चिन्मय मंगेश वानखेडे उपस्थित होते.

## प्रोसिडिंग बुकवरून गाजली बोरीअरब ग्रामपंचायतीची सभा

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**बोरीअरब :** आवास योजनेच्या नवीन यादीला मंजुरी देणे तसेच पात्र लाभार्थ्यांची नवीन नावे समाविष्ट करण्यासाठी आयोजित ग्रामसभा मासिक प्रोसिडिंग बुकच्या मुद्द्यावरून चांगलीच गाजली. ग्रामपंचायत प्रशासकाची मुदत २२ ऑगस्ट रोजी संपल्याने ग्रामसभा घेण्यासाठी दारव्हा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी फुटाणे यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र ते तब्बल दीड तास उशिराने ग्रामसभा स्थळी पोहोचल्याने सुरुवातीपासूनच गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी ग्रामसभेची जबाबदारी स्वीकारण्यास तयार नसल्याने ग्रामसभा सुमारे दीड ते दोन तास उशिराने सुरू झाली. सभा सुरू होताच विरोधी सदस्यांनी मासिक बैठकीचे प्रोसिडिंग बुक ग्रामसभेत दाखविण्याची मागणी लावून धरली. मागील पाच वर्षांत सरपंच व ग्रामसेवकांनी मासिक बैठकीत प्रोसिडिंग बुक दाखविले नाही, तसेच त्यावर सदस्यांच्या सह्या घेतल्या नसल्याचा आरोप विरोधकांनी केला. साध्या रजिस्टरवर ठराव लिहून सह्या घेतल्याचा आरोपही करण्यात आला. अखेर गोंधळाच्या वातावरणातच ग्रामसभा पार पडली. ग्रामसभेला माजी सरपंच लक्ष्मण वांजरेकर, अशोकराव ठाकरे, माजी उपसरपंच ओम लड्डा यांच्यासह माजी सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उमरखेड विधानसभेत शिवसेना उबाठाचा भगवा फडकविण्याचा निर्धार

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**उमरखेड :** उमरखेड शहरातील शासकीय विश्रामगृहात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची महत्त्वपूर्ण आढावा बैठक जिल्हाप्रमुख प्रवीण शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि विधानसभा संपर्कप्रमुख मनोज भाऊ कोपते यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

यावेळी प्रवीण शिंदे आणि मनोज कोपते यांनी उमरखेड विधानसभा मतदारसंघात संघटनबांधणीला प्राधान्य देण्याचे स्पष्ट केले. आजी-माजी पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि ज्येष्ठ शिवसैनिकांना सोबत घेऊन प्रत्येक गावात शाखा स्थापन करण्यात येणार आहे. 'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' या धोरणानुसार पक्षाची विचारधारा आणि मशाल चिन्ह घराघरांत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय-अत्याचार झाल्यास शिवसेना पदाधिकारी त्यांच्या लढ्यासाठी रस्त्यावर उतरतील. नागरिकांची कामे शासकीय कार्यालयांत मार्गी लागावीत, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन देण्यात आले. प्रत्येक गावात, वॉर्डात शाखाप्रमुख, गटप्रमुख आणि बूथप्रमुखांच्या नियुक्त्या करून संघटना मजबूत करण्याचे आवाहन करण्यात आले.

बैठकीत ज्येष्ठ शिवसैनिक सुधाकरराव जाधव, साहेबराव शिंदे, दिगंबर सूर्यवंशी मामा, अनिल कदम, प्रकाशराव फटाले, तानाजी शिंदे, गुलाब धोंगडे, रमेश शिंदे, रमेश होले, शेख वयोउद्दीन, शेषराव कानडे आणि नागेश गोरेवाड यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन तालुकाप्रमुख सतीश नाईक यांनी केले. सहसंपर्कप्रमुख ॲड. बळीराम मुटकुळे, राजेश खामणेकर, भीमराव भालेराव, डॉ. अजय नरवाडे, निलेश जैन, संतोष जाधव, अनिल कांबळे, संभाजी गोरडकर, अमोल राठोड, गजानन पवार, मनोज राठोड, श्रीराम पाटील कदम, विजय शिंदे, सतीश इंगोले, उत्तमराव कदम, गजानन वानखेडे, देवानंद भारती, संदीप आंबेकर, गजानन आजेगावकर, सतीश कुबडे, श्रीनिवास शर्मा, सुधीर कवाने, रवी कदम, पिंटू गौळकर, बालाजी जाधव, श्रीकांत शहा, नारायण माने, पंजाब टिळेवाड, नासर देशमुख, शिरीष शिंदे, मुकेवाड, दिलीप जाधव, लक्ष्मण शिरडकर, हिटलर राठोड, सचिन राठोड आणि अरुण वास्टर यांच्यासह असंख्य पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# युवक काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी डॉ.मोहसीन खान यांची नियुक्ती

## अल्पसंख्याक युवक काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी सोहेल चौहान

प्रतिनिधी ४ सप्टेंबर





**पुसद :** पुसद शहर युवक काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी डॉ. मोहसीन खान, तर अल्पसंख्याक युवक काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी सोहेल चौहान यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमुळे पुसद शहरातील युवक काँग्रेसला नव्या नेतृत्वाची दिशा मिळणार असून, युवकांचे प्रश्न आणि सामाजिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यास चालना मिळणार आहे.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी युवकांना संघटित करून काँग्रेसची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासोबतच पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला. नियुक्तीनंतर काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी डॉ. मोहसीन खान व सोहेल चौहान यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या नियुक्तीचे श्रेय जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक, प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस डॉ. नदीम, माजी आमदार डॉ. वजाहत मिर्झा, प्रदेश अल्पसंख्याक महासचिव सय्यद इश्तियाक, शहराध्यक्ष जिया शेख, युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद बघाडे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष जाफर एन. खान, विधानसभा अध्यक्ष अभिलाष खैरमोड, विधानसभा निरीक्षक सुजीत मनकामे आणि तालुकाध्यक्ष ज्ञानदीप कांबळे यांना दिले असल्याचे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# हत्येतील आरोपींवर कठोर कारवाई करा!

## पालकमंत्र्यांचे निर्देश; खा. डॉ. अनिल बोंडे, आ. प्रविण पोटे यांनी केले कुटूंबियांचे सांत्वन

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**अमरावती :** अमरावती शहरातील रविनगर चौकात १७ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनी शर्वरी गणेश हाळके हिची करण्यात आलेली निर्घृण हत्या अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक आहे. या दुःखाच्या प्रसंगी राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तातडीने दूरध्वनीवरून हाळके कुटुंबाशी संवाद साधत त्यांचे सांत्वन केले. या कठीण काळात शासन कुटुंबाच्या पाठीशी ठाम उभे असल्याचे आश्वस्त केले.

घटनेचे गांभीर्य ओळखून राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे, विधान परिषदेचे आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी तात्काळ मृत शर्वरीच्या घरी जाऊन नातेवाईकांची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले.

**राजापेठ पोलीस ठाण्यात भेट; आरोपीवर कठोर कारवाईची मागणी**

कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर खासदार डॉ. अनिल बोंडे आणि आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी थेट राजापेठ पोलीस ठाणे गाठले. तेथे उपस्थित पोलिस उपायुक्त श्याम घुगे यांच्यासह अन्य पॉलिसी अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांनी घटनेचा कसून तपास करण्याची आणि आरोपीला लवकरात लवकर गजाआड करण्याची जोरदार मागणी केली.

हा प्रकार अत्यंत क्रूर आणि निंदनीय आहे. अशा गुन्हेगारांना समाजात कोणतीही जागा नसून आरोपीला लवकरात लवकर अटक करून हे प्रकरण जलदगती न्यायालयात (Fast Track Court) चालवण्यात यावे, जेणेकरून शर्वरीला न्याय मिळेल, असे निर्देश बोंडे पोटे यांनी पोलिसांना दिले.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही पोलीस प्रशासनाला दूरध्वनीवरून स्पष्ट निर्देश दिले आहेत की, या घटनेतील आरोपीला त्वरित अटक करून त्याच्यावर कठोरातील कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

# बिझीलॅन्ड येथे अवैधरीत्या विदेशी दारू बाळगुन वाहतुक करणाऱ्या इसमावर कार्यवाही

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**अमरावती :** बिझीलॅन्ड येथे अवैधरीत्या विदेशी दारू बाळगुन वाहतुक करणा-या इसमावर कार्यवाही करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन नांदगाव पेठ हददीमध्ये दिनांक ०३/०९/२०२६ रोजी वरिष्ठ यांच्या आदेशाने सोबत पोहेकॉ १२२२, पोकॉ ११८८,१८९९,१०४ असे पो.स्टे. हददीत पेट्रोलिंग तसेच रेकॉर्ड वरील गुन्हेगार यांना तपासणे कामी पो.स्टे. नांदगाव पेठ येथुन खाजगी वाहनाने रवाना असताना पो. ठाणे परीसरात पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारा कडुन प्राप्त माहीती नुसार एक इसम हा बिझीलेंन्ड जवळ त्याच्या जवळील पिशव्यामध्ये अवैधरीत्या विदेशी दारू चे वाहतुक करून विक्री करीता घेवुन जात आहे. अशा मिळालेल्या खात्रीलायक गोपनीय माहीती वरून पो. स्टॉफ सह बिझीलॅन्ड येथे गेलो असता एक इसम बिझीलॅन्ड रोड च्या बाजुला पिशव्या घेवुन उभा दिसला.

सदर ईसमास ताब्यात घेवुन त्याचे पिशव्यांची झडती घेतली असता रॉयल स्टॅग २ लीटर चे एकुन २५ नग तसेच रॉयल चॅलेंज २ लिटर चे एकुन १० नग मिळुन आले. वरून पो. ठाणे नांदगाव पेठ येथे अप क्रं. ३७९/२०२६ कलम ६५ (अ) मदाका प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

सदर आरोपी नरेश कुमार पारसमन चोपडा, वय ४३ वर्ष, रा. नोरणा हॅरीटेज बिल्डींग डोंगरवाडा जि. साउथ गोवा यांचे ताब्यातुन रॉयल स्टॅग ०२ लीटर चे एकुन २५ नग प्रत्येकी १८०० रू , रॉयल चॅलेंज ०२ लिटर चे एकुन १० नग प्रत्येकी १८०० रू कि . अ . ४५,०००/-रू, कि.अ. १८,०००/-रू असा एकुण ६३,०००/-रू चा मुददेमाल जप्त केला. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त परीमंडळ १ यशवंत सोळंके, सहा. पोलीस आयुक्त नयन आलुरकर यांचे मार्गदर्शनात वरीष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांचे नेतृत्त्वात पोउपनी गणेश राऊत, पोउपनी ओमप्रकाश देशमुख, पोउपनी दिनेश माणुसमारे, पोहेकॉ सतीश देशमुख, पोकॉ वैभव तिखिले, राजीक खान, शोएबुददीन सैयद, निलेश साविकार, प्रफुल खोब्रागडे, चालक वैभव धुरंधर यांनी केली.

# 10 सप्टेंबर पर्यंत दिलासादायक हवामान!

## प्राध्यापक अनिल बंड यांचा अंदाज

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अमरावती :** १० सप्टेंबर पर्यंत दीलासादायक हवामान प्राध्यापक अनिल बंड यांचा अंदाज आहे. १ जुन पासून आजपर्यंतचा विचार केला तर विदर्भात पावसाची तुट २७% आहे. सध्या विविध मॉडेल्स जे हवामानशास्त्रिय संकेत देत आहे त्यानुसार सप्टेंबर महिन्यात सुद्धा मान्सूनची स्थिती चांगली राहण्याची शक्यता नाही. तथापि,

सध्या ईशान्य मध्य प्रदेश आणि सभोवताल सक्रिय असलेल्या ठळक कमी दाबाचा पट्टा आणि चक्राकार वारे तसेच अरबी समुद्रातून मध्य प्रदेश पर्यंत गेलेली द्रोणीय स्थिती यामुळे पुढील पाच दीवसात विदर्भात काही ना काही प्रमाणात बरेच ठिकाणी हलक्या मध्यम पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच विदर्भात ४/५ तारखेला तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस सुद्धा पडुन शकतो. कमी जास्त प्रमाणात १० सप्टेंबर पर्यंत कुठे ना कुठे पाऊस पडण्याची शक्यता आहे.

परंतु १० तारखेनंतर विदर्भात पावसाचा खंड पडण्याचे संकेत मिळत आहेत. वरील परिस्थिती विचारात घेता सध्या ऑक्सिजन वर असलेल्या पीकांना बहुतांश ठिकाणी जिवदान मिळणार. परंतु १५ सप्टेंबर च्या आसपास पुन्हा पाऊस न आल्यास सोयाबीन ला काही भागात नुकसान होऊ शकते. सध्या म.प्र. सिमेवर असलेले कमी दाबाचे क्षेत्र तुलनात्मक रित्या मंद आहे तसेच ते हळूहळू पश्चिम -वायव्य दिशेने पुढे सरकत आहे. त्यामुळे सध्या पाऊस पुर्व विदर्भातच दीसत आहे. परंतु ते थोडे आनखि पुढे सरकले म्हन्जे पश्चिम विदर्भात सुद्धा त्याचा प्रभाव दीसेल. परंतु अकोला बुलडाणा जिल्ह्यात पाऊस बेताचाच पडेल असा अंदाज आहे.

# सराईत वाहन चोरांकडून तब्बल 16 दुचाकी जप्त

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**अमरावती:** राजापेठ पोलीसांची उल्लेखनीय कामगीरी केली असून सराईत वाहन चोरांकडून १६ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

फिर्यादी सचीन बाळकृष्ण वैदय, वय ४० वर्षे, रा. भातकुली पोलीस स्टेशन जवळ, भातकुली अमरावती यांनी दिनांक १.०९.२०२६ रोजी तक्रार दिली की, त्यांची हिरो कंपनीची सलेंडर प्लस गाडी कमांक एम एच २७ ई ई ७३७० कि अं ७०,००० रूची ही राजापेठ बस स्थानक येथुन दिनांक २०.०८.२६ चे ११.३० वा ते दिनांक २२.०९.२६ चे १९.३० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने नेली आहे. अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून पो स्टे राजापेठ येथे अपराध क्रमांक ७७१/२०२६ कलम ३०३(२), भान्यासं अन्वये दाखल आहे.

सदर गुन्हयाच्या तपासकामी पोलीस स्टेशन राजापेठ येथील वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनात मिळालेल्या माहीतीच्या आधारे सपोनी नितीन शिंदे व डि बी पथक यांनी सदरचा गुन्हा उघड केला अटक करण्यात आलेले आरोपी वसीम खान बब्बु खान, वय ४० वर्षे, रा. हैदरपुरा, मद्रासीबाबा दर्गा जवळ, अमरावती, शेख इरफान उर्फ भु-या शेख मंसुर, वय ३६ वर्षे, रा. सादीया नगर, वसीम टॉईल्सवाला जवळ, हैदरपुरा, अमरावती सददाग अली फैयाज अली, वय ३५ वर्षे, रा. बिस्मील्ला नगर, लालखडी रोड, अमरावती आरोपीचे नाव असून त्यांच्या ताब्यातून एकुण ४,५८,००० रूपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि- २ संजय खटाळे, सहायक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप चव्हाण, पोलीस निरीक्षक उमेश मुंढे, सपोनी नितीन शिंदे, पोहेकॉ मनीश करपे, पोहेकॉ पवन तिवारी, पोहेकों पंकज खटे, पोहेका रवी लीखीतकर, पोहेकों शशी शेळके, पोकों अंकुश काळे, पोकों प्रशांत बेलोरकर, पोकॉ अमोल खंडेजोड, पोकों आबीद शेख, पोकों रफीक खान, पोकों सतीश टपके, पोकों आकाश यादव, पोका अर्जुन कदम, पोकों अमोल देशमुख, पोकों पंकज गाठे, यांनी केली.

# लाच घेतांना लिपिक व ऑपरेटर एलसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**धारणी :** मेळघाटातील धारणी तालुक्याला कोणाचे ग्रहण लागले आहे याचा शोध घेण्याची गरज दिसत आहे. गुरुवार लाच लुचपत विभाग अमरावती घटक अमरावती यांच्या वतीने तक्रारदार दिं १/०९/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांचा शेती व्यवसाय असून त्यांच्याकडे ६ एकर शेती असून सदर शेतीवर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी योजने अंतर्गत घेतलेले कर्ज कर्ज माफी झाली होती. १९/०८/२०२६ रोजी सहदुय्यम निबंधक कार्यालय धारणी येथे गेले असता पॉवर अटर्नी रजिस्टर करून देण्याकरिता रजिस्टर कार्यालय धारणी येथे कनिष्ठ लिपिक श्री संतोष विष्णुपंत दुधंडे हे तक्रार दार यांना ७००० रुपयाची लाचेची मागणी करीत आहेत अशी तक्रार प्राप्त झाली होती. दि ०३/०९/२०२६ रोजी १५.३२वा ते १५.५५ वा दरम्यान दुय्यम निबंधक कार्यालय धारणी येथे झालेल्या सापळा कारवाही दरम्यान मागणी केलेल्या ४८०० रुपये लाच रक्कम देण्यासाठी तक्रार दाराला पंचासह पाठवले. श्री संतोष विष्णुपंत दुधंडे यांनी लाच रक्कम ४८०० लकी राठोड यांच्याकडे देण्यास सांगितले. ही लाच रक्कम स्वीकारली तेंव्हा दोघांना सापळा पथकाने ताब्यात घेतले. तसेच खाजगी इसम साबुलाल भिकावेकर यास कार्यालयाचे बाहेरून ताब्यात घेतले. पोलीस स्टेशन धारणी, जिल्हा अमरावती येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७, १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोपीचे राहते घरी घरझळती घेण्याची कारवाई सुरू आहे. सापळा अधिकारी चित्रा मेसरे पोलीस निरीक्षक, पर्यवेक्षक अधिकारी श्रीमती मंजुषा भोसले पोलीस उप अधीक्षक, सापळा पथक पोलीस निरीक्षक संजय शिंदे, सुधीर चर्जन, वैभव जायले, सतीश कितुकले मार्गदर्शन श्री बापू बांगर पोलीस अधीक्षक, सुनील किनगे अप्पर पोलिस अधीक्षक या सर्व कर्तव्यदक्ष अधिकारी यांनी अथक परिश्रम घेऊन सापळा यशस्वी केला.

# शासकीय आश्रमशाळा शिक्षक भरतीसाठी अमरावती विभागातील 292 उमेदवार पात्र

## कागदपत्रांची पडताळणी प्रक्रिया ५ सप्टेंबर पर्यंत पूर्ण होणार

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अमरावती :** आदिवासी विकास विभागांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील गट-क (अराजपत्रित) पदे भरण्यासाठी पवित्र पोर्टलमार्फत शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांची कागदपत्र पडताळणी प्रक्रिया गुरुवार ३ सप्टेंबर पासून सुरू झाली असून शनिवार ५ सप्टेंबर पर्यंत ही प्रक्रिया पार पडणार आहे. शिक्षण आयुक्तालयाकडून राज्यातील १६०० पात्र उमेदवारांची यादी प्राप्त झाली असून यात अमरावती विभागातील २९२ उमेदवारांचा समावेश आहे.

शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षक संवर्गातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया वेगाने सुरू आहे. शिक्षण आयुक्तालयाकडून व्यावसायिक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांची यादी प्राप्त झाली आहे. या उमेदवारांच्या शैक्षणिक व व्यावसायिक कागदपत्रे पडताळणीचे सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यानुसार उमेदवारांनी निर्धारित केलेल्या ठिकाणी, दिनांक व वेळेत उपस्थित राहावे असे आवाहन आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड यांनी केले आहे.

शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या २४२१ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. शिक्षण आयुक्तालयाकडून मुलाखतीशिवाय निवड झालेल्या प्राथमिक शिक्षक- ९२७, माध्यमिक शिक्षक-४२१ आणि उच्च माध्यमिक शिक्षक- २५२ अशा एकूण १६०० उमेदवारांची यादी प्राप्त झाली आहे. त्यात पेसा क्षेत्रातील ४५९ तर नॉन-पेसा क्षेत्रातील ११४१ उमेदवारांचा समावेश आहे. संबधित उमेदवारांच्या मुळ शैक्षणिक अर्हता कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. नाशिक विभागात सर्वाधिक पात्र ५८८ उमेदवार असून, त्याखालोखाल ठाणे विभागात ४२४ उमेदवार, नागपूर विभागात २९६उमेदवार तर अमरावती विभागात २९२ उमेदवार आहे. यासंदर्भातील सविस्तर जाहीर सूचना व वेळापत्रक नाशिक, ठाणे, अमरावती आणि नागपूर अपर आयुक्त कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आले.

संबंधित उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर नोंदविलेल्या दाव्यांच्या पुष्ट्यर्थ आवश्यक असलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे, जाहिरातीनुसार लागणारी कागदपत्रे आणि प्रत्येक कागदपत्राची एक साक्षांकित (self-attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. निर्धारित केलेल्या दिनांक व वेळेत अनुपस्थित राहिल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहणार आहे. पात्र उमेदवारांची सविस्तर यादी https://tribal.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला वेळोवेळी भेट देण्याचे आवाहन विभागाकडून करण्यात आले आहे.

संवर्गनिहाय पदसंख्या पेसा क्षेत्रातील १९६ मराठी माध्यमाचे प्राथमिक शिक्षक , १६ इंग्रजी माध्यमाचे प्राथमिक शिक्षक, ९४ मराठी माध्यमाचे माध्यमिक शिक्षक, २ इंग्रजी माध्यमाचे माध्यमिक शिक्षक आणि १५१ उच्च माध्यमिक शिक्षक भरती करण्यात येणार आहे.

# शासकीय बालगृहातील बालक 'सारंग सलीम'च्या कुटुंबीयांचा शोध घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अमरावती:** येथील रुक्मिणीनगरात स्थित शासकीय वरिष्ठ मुलांच्या बालगृहात प्रवेशित असलेल्या सारंग सलीम या बालकाच्या घरचा पत्ता व कुटुंबीयांची ओळख पटविण्यासाठी चाइल्ड हेल्पलाइन अमरावतीमार्फत शोधमोहीम सुरू आहे. या बालकास किंवा त्याच्या आई-वडील, भाऊ-बहिणी व कुटुंबीयांना ओळखणाऱ्या व्यक्तींनी चाईल्ड हेल्पलाईन 1098 व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमरावती (संपर्क क्रमांक 9021358816) तसेच चाईल्ड हेल्प लाईन समन्वयक (संपर्क क्रमांक 9922604308) या संबंधित यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय गट यांनी केले आहे. बालकाच्या कुटुंबीयांचा शोध लागल्यास त्याची ओळख पटवून पुढील कायदेशीर व पुनर्वसनात्मक कार्यवाही करण्यास मदत होणार आहे.



बालकाने दिलेल्या माहितीनुसार त्याच्या आईचे नाव नीतू, भाऊ निलेश व नीलू आणि बहिणी शितल व खुशी अशी नावे आहेत. बालकाने पूर्वीचा पत्ता मनपा शाळा क्रमांक 2, मसानगंज, अमरावती असा सांगितला आहे. त्याची आई अमरावती येथे 'संगीता' नावाच्या महिलेच्या भाजीच्या दुकानातून भाजी घेत असल्याचेही बालकाने सांगितले आहे.बालकाचा शोध यापूर्वीही संबंधित यंत्रणांकडून घेण्यात आला होता. तसेच जुलै 2026 मध्ये बालकास अमरावती येथे आणून त्याने सांगितलेल्या परिसरात प्रत्यक्ष चौकशी करण्यात आली मात्र कुटुंबीयांचा ठोस पत्ता मिळू शकला नाही.

# जुना बायपास मार्गावर हलक्या व जड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अमरावती:** शहरात वाढती लोकसंख्या, वाहनांची मोठी वर्दळ आणि त्यामुळे होणारे प्राणघातक अपघात रोखण्यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने शहरातील बाजारपेठ असलेले महत्वाचे मार्ग तसेच वेलकम पॉंईट ते अलमास गेट बडनेरापर्यंत असलेला जुना बायपास आदी प्रमुख मार्गांवर हलक्या व जड मालवाहू वाहनांना प्रवेशबंदी घालण्याबाबतची अंतिम अधिसूचना पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनवणे यांनी बुधवार, २ सप्टेंबर २०२६ रोजी जारी केली आहे.

हलके व जड वहानांना प्रवेशबंदी संदर्भात १७ नोव्हेंबर २०२० च्या अंतिम आदेशात अंशत: बदल करणे आवश्यक असल्याने शहरात प्रवेशबंदी संबंधाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी अंतिम अधिसुचना जारी करण्यात आली होती.त्यावर आक्षेप प्राप्त झाले. आक्षेप तसेच सामान्य नागरिकांच्या संरक्षणाचा सर्वांगीण विचार करून जडवाहन प्रवेशबंदी संबंधाने २ सप्टेंबर रोजी अंतिम अधिसूचना जारी करण्यात आली आहे. वाहनांमध्ये मालविरहित (खाली गाडी) वजन २,००० किग्रॅ (२ टन) पेक्षा जास्त असणारी सर्व हलकी व जड व्यावसायिक वाहने सुपर एक्सप्रेस हायवेचा वापर न करता जुना बायपास मार्गाचा तसेच शहरातील गर्दी असलेल्या मार्गाचा अवलंब करीत असल्याने या मार्गांवर वाहनांची वर्दळ अधिक होऊन किरकोळ व गंभीर स्वरूपाच्या अपघाताचे प्रमाण वाढले आहे. शहरात सन २०२४ ते जुलै २०२६ या काळात एकूण १,१०८ अपघात झाले आहेत. यातील २१२ प्राणघातक अपघातांमध्ये २४६ निष्पाप नागरिकांचा बळी गेला असून ९१३ व्यक्ती गंभीर व किरकोळ जखमी झाल्या आहेत. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रसिद्धी पत्रात सांगण्यात आले आहे.

दररोज सकाळी ६.३० ते रात्री ९.३० वाजेपर्यंत वाहनांना शहरात प्रतिबंध असणार असून या वाहनांमध्ये मालविरहित (खाली गाडी) वजन २,००० किग्रॅ (२ टन) पेक्षा जास्त असणारी सर्व हलकी व जड व्यावसायिक वाहने. ज्या वाहनांची भारसहित वहन क्षमता २ टनांपेक्षा जास्त आहे अशी सर्व वाहने. सर्व प्रकारच्या अति अवजड (मल्टी-ॲक्सल) वाहनांचा समावेश आहे.

# मोटारसायकल चोरी, जुगार, गांजा व अवैध दारुविरुद्ध धडक कारवाई

प्रतिनिधी ४ सप्टेंबर




**अमरावती :** मोटारसायकल चोरी, जुगार, गांजा व अवैध दारूविरुद्ध धडक कारवाई गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे.

निकेतम कदम, पोलीस अधीक्षक यांनी जिल्हयात होणाया चोरी, घरफोडी, मोटरसायकल चोरी इत्यादीn गुन्हे उघडकीस आणण्याबाबत व अवैद्य धंदे यावर कार्यवाही करणेबाबत स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांना निर्देशीत केले आहे.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी मोर्शी, दर्यापूर, वरूड, तिवसा व मंगरूळ दस्तगीर परिसरात विविध ठिकाणी कारवाई करून मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणले तसेच जुगार, गांजा बाळगणे व अवैध देशी दारू वाहतुकीविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडः - मोर्शी उपविभागात पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी सलीम खान इब्राहिम खान, रा. सुलतानपुरा, मोर्शी यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने सालबर्डी येथून तसेच फरार साथीदारासह परतवाडा आठवडी बाजारातून मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीच्या ताब्यातून 02 मोटारसायकली, किंमत ₹50,000/- जप्त करण्यात आल्या.

तसेच दर्यापूर परिसरात आरोपी रोशन विक्रम चव्हाण यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता आमला-दर्यापूर रोड तसेच दर्यापूर येथून मोटारसायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या ताब्यातून 2 मोटारसायकली, किंमत ₹80,000/- जप्त करण्यात आल्या. याशिवाय दर्यापूर पोलीस स्टेशनच्या सन 2025 मधील मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यात आरोपी अनुज मदन शर्मा यास ताब्यात घेऊन गुन्ह्यात चोरी गेलेली ₹50,000/- किंमतीची मोटारसायकल हस्तगत करण्यात आली.

**जुगाराविरुद्ध धडक कारवाई:**

वरूड व मंगरूळ दस्तगीर परिसरात 52 ताश पत्त्यांवर जुगार खेळणा-या इसमांविरुद्ध कारवाई करून रोख रक्कम, मोबाईल व मोटारसायकलींसह एकूण ₹2,39,650/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरूड येथील कारवाईत ₹41,350/- तर मंगरूळ दस्तगीर येथील कारवाईत ₹1,98,300/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधित इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

गांजा विक्रीकरीता बाळगणाऱ्या इसमाविरुद्ध कारवाई:- तिवसा बसस्थानक परिसरात मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी योगेंद्र उर्फ छोटू गजानन खाडे, रा. कैकाडीपुरा, परतवाडा यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून *5 किलो 103 ग्रॅम गांजा, किंमत अंदाजे ₹2,55,150/-, मोबाईल व स्कूल बॅग असा एकूण ₹2,65,350/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी NDPS Act अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शुक्रवार दि. ४ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






# शासनाचा निधी हडपण्यावर जोर, संस्था चालक चोरावर मोर !

## * सखोल चौकशी करा, जागा ताब्यात घ्या, संबंधितांवर गुन्हे दाखल करा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**येथील राजस्थान शिक्षण संस्थेने शासकीय जागेवर अतिक्रमण करून अवैध रित्या वस्तीगृह बांधले. व शासनाचे कोट्यवधीचे अनुदान हडप केले. आता चोरावर मोर होत या संस्था अध्यक्षांनी शासनाचीच जागा शासनाला म्हणजे वैद्यकीय महाविद्यालयाच्या मुलींच्या वस्तीगृहाला भाड्याने देवून पैसे लुटण्याचा धंदा सुरू केला. मुलींच्या वसतीगृहाची ईमारत बेकायदेशीर बांधल्या प्रकरणी 'या' संस्थेतील गैरकारभार चव्हाट्यावर आला आहे. शासनाने त्या वादग्रस्त जागेचा नमूना 'ड' चार वर्षापुर्वीच रद्द केला आहे.**






हाच तो नमुना 'ड'

तरीपण राजस्थान शिक्षण संस्थेचे विद्यमान अध्यक्ष ठाकूरदास मालाणी व त्यांच्या कार्यकारिणीतील उच्चशिक्षीत आणि फक्त सह्याजीराव असलेल्या संचालक मंडळाने 'ती' वादग्रस्त मुलींच्या वसतीगृहाची जागा वाशीम येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी भाड्याने दिल्याचा पराक्रम केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. आधीच या संस्थेचे माजी सचिव, कार्याध्यक्ष आणि सह्याचे अधिकार असलेले राजेंद्र सोमाणी यांच्या कार्यकाळातील अनेक घोटाळे झाल्यामुळेच त्यांची विद्यमान संचालक मंडळातून हकालपट्टी करण्यात आली आहे. सोमाणींचा कित्ता मालाणींनी घडविल्यामुळे 'या' संस्थेच्या मागील २० वर्षातील आर्थिक व्यवहारासह संचालक मंडळाने घेतलेल्या सर्व ठरावाची शासनाने सखोल चौकशी करण्याची मागणी केल्या जात आहे.

येथील राजस्थान शिक्षण मंडळाद्वारे संचालीत राजस्थान आर्य कला, मि.क. वाणिज्य आणि स.रा.राठी विज्ञान महाविद्यालय, वाशीम तसेच रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी जवाहर नवोदय विद्यालयाजवळ असलेल्या शासकीय जागेवर अतिक्रमण करून त्या जागेवर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या कोट्यवधीच्या निधीतून मुलींच्या वसतीगृहाची टोलेजंग ईमारत बांधली. हे बांधकाम तत्कालीन कर्तेधर्ते आणि कमिशन खाण्यात पटाईत असलेल्या कारभारी राजेंद्र सोमाणी यांच्या अधिपत्याखाली झाल्याचे सर्वश्रृत आहे. उल्लेखनिय म्हणजे या वसतीगृहाचे बांधकाम झाले तेव्हापासून या वसतीगृहात राजस्थान महाविद्यालयातील एकही मुलगी त्या वसतीगृहात राहिली नसल्याची बाबही जगजाहिर आहे.

पैशासाठी काहीही करणाऱ्या लालची सोमाणींनी या मुलींच्या वसतीगृहात शासकीय, खासगी सेवेत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना भाडेतत्वावर खोल्या दिल्याचीही बाब यापुर्वीच सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांनी उघडकीस आणली होती. देवढे यांनी शासनासह वाशीमच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे 'या' वादग्रस्त अतिक्रमीत जागेसंदर्भात पुराव्यासह तक्रारी देवून सर्व दोषींवर फौजदारी कारवाई करून ती वादग्रस्त जागा शासनाने ताब्यात घेण्यासाठी पाठपुरावा केला आहे.

अद्यापही देवढे यांचा पाठपुरावा सुरूच असून जिल्हाप्रशासनाने मौनव्रत धारण करून राजस्थान शिक्षण मंडळातील आजी-माजी संचालकांना 'आश्रय' दिल्याची चर्चा आहे. म्हणूनच या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष ठाकूरदास मालाणी यांनी व त्यांच्या सहकारी संचालकांनी शासकीय जागेवर अतिक्रमण करुन संस्थेने बेकायदेशीर बांधकाम केलेल्या मुलींच्या वसतीगृहाची ईमारत वाशीमच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहासाठी भाड्याने दिल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. शासनाने राजस्थान शिक्षण मंडळ, वाशीम च्या मागील २० वर्षातील सर्व आर्थिक व्यवहाराची आणि आजी-माजी संचालक मंडळाने घेतलेल्या सर्व ठरावाची वरिष्ठ सनदी अधिकाऱ्या मार्फत चौकशी करून या घोटाळ्यात व भ्रष्टाचारात सहभागी असलेल्या सर्व दोषींविरूद्ध फौजदारी कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे यांनी केली आहे.

### महसुलमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र भ्रष्ट कर्मचाऱ्यांचे टाळाटाळीचे सत्र...

१३ वर्षापासून राजस्थान आर्य शिक्षण संस्थेने अनाधिकृत ताब्यात घेतलेली महसुल प्रशासनाची जागा ताब्यात घ्यावी असे पत्र तत्कालीन महसुल मंत्री व जिल्हाधिकारी व आताचे महसुल मंत्री व जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाला दिले आहे. मात्र प्रशासनात असलेल्या भ्रष्ट अवगुण असलेल्या धुर्त कर्मचाऱ्याने आर्थिक देवाण घेवाण करून टाळाटाळीचे सत्र सुरू ठेवले आहे. महसुल मंत्र्याच्या व जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्राला लालफितीत ठेवणाऱ्या भ्रष्टअधिकाऱ्यावर कारवाई करून जागा ताब्यात घ्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे यांनी केली आहे.

### १३ वर्षाचा लढा, अतिक्रमण काढा

शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून वसतीगृहाच्या नावावर कोट्यवधीचे अनुदान घेवून शासनाची व जनतेची फसवणूक करणाऱ्या आर्य शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाची व अधिकाऱ्यांची मिलीभगत असून यामध्ये कोट्यवधीची फसवणूक झाली आहे. यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे यांनी १३ वर्षापासून लढा देत आहेत. विविध आंदोलन व उपोषण, निवेदनातून अतिक्रमण काढण्याची मागणी करीत आहेत.

## थोडक्यात

### शिक्षणाची साथ सोडली नाही; मेहनतीने शिक्षकपदाची संधी मिळवली

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

**१८ वर्षांनंतर इस्त्राईल यांची निवड**

शिक्षण पूर्ण होऊन तब्बल १८ वर्षे उलटली, तरी शिक्षक होण्याचे स्वप्न मनाशी बाळगून अभ्यासाची साथ न सोडणाऱ्या सय्यद इस्त्राईल इस्माईल यांनी अखेर आपल्या जिद्द व मेहनतीच्या जोरावर यश मिळवले. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून त्यांची नागपूर जिल्हा परिषदेत प्राथमिक शिक्षक म्हणून निवड झाली असून, त्यांच्या या यशाचे रिसोड शहरात सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी सातत्याने अभ्यास सुरू ठेवला. या काळात शैक्षणिक तसेच कॉम्प्युटर क्लासेसच्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कामही केले. त्यांच्या यशानिमित्त महम्मद शेख रऊफ शेख, डॉ. अझहर शेख, पत्रकार फिरोजशाह, सैय्यद इरफान व अल्ताफ शेख यांच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व पेढा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या आई-वडिलांचाही शाल व हार देऊन सन्मान करण्यात आला. १८ वर्षांचा कालावधी उलटूनही अभ्यासाची साथ न सोडता त्यांनी शिक्षक होण्याचे स्वप्न पूर्ण केले. त्यांचे हे यश जिद्द, सातत्य आणि कठोर परिश्रमाचे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

### शिक्षकपदी निवड झालेल्या गुणवंतांचा नागरी सत्कार



● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बाळगून अनेक वर्षे अथक परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर शिक्षक पदावर निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा कारंजा येथे नागरी सत्कार करण्यात आला. ग्रामीण व मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या या उमेदवारांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळविलेले यश हे इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. भाजपचे तिवसा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार राजेश वानखडे यांचे स्वीय सहाय्यक अविनाश पाकधने यांच्या कारंजा लाड येथील निवासस्थानी हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. अविनाश पाकधने, शेलुबाजार मित्र मंडळाचे राम राऊत, कारंजा मित्र मंडळाचे अध्यक्ष अक्षय जगताप, युवा शेतकरी नेते श्रीकांत ठाकरे तसेच कृष्णा कॉलोनी रहिवासी संघ, कारंजा यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## एसीबीच्या कारवाईची वाढली रफ्तार...

# २ हजाराची लाच घेतांना पोलिस गिरफ्तार !

## *पोलिसांच्या अवैध वसूलीनीही केली हद्दपार *माफियांचे बनले यार
## * दोन हजारांच्या लाचप्रकरणी हेडकॉन्स्टेबल फरार; खासगी इसम ताब्यात

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**वाशीम जिल्ह्यातील पोलिसांची प्रतिमा दिवसेंदिवस मलीन होत चालली आहे. अवैध धंद्यांमध्ये पोलिसांची थेट भागिदारी असून वसूलीनेही हद्दपार केली आहे. वाहतुकीच्या नावावरही लूट सुरू असून अवैध वसुली करतांना सिटी न्युज सुपरफास्टच्या हाती आतापर्यंत ७ व्हिडीओ लागले आहेत. यामध्ये ७ पोलिस थेट पैसे घेतांना दिसून आले आहेत. सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्तानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. आता पुन्हा २ हजाराची लाच घेतांना पोलिसाला एसीबीने रंगेहाथ पकडल्याने पोलिस विभागाच्या भ्रष्टाचाराचे ताशोरे चव्हाट्यावरच आले आहे. रक्षकच भक्षयक बनल्याने न्याय कोणाकडे मागावा अशी स्थिती वाशीम जिल्ह्यातील पोलिसांनी निर्माण केली आहे.**

गुन्ह्याचे दोषारोपपत्र पाठविण्यासाठी झेरॉक्स काढण्याच्या कारणावरून दोन हजार रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपावरून मंगरूळपीर पोलीस ठाण्यातील हेडकॉन्स्टेबल सुनील टाले याच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी सापळा रचला. टाले यांच्या सांगण्यावरून खासगी इसम विजय चंदू चव्हाण याने दोन हजार रुपयांची लाच स्वीकारल्याचे सापळा कारवाईत निष्पन्न झाल्याची माहिती एसीबीने दिली.

दरम्यान, टाले यास ताब्यात घेण्यासाठी पथक गेले असता त्याने अटकेला मज्जाव करून चारचाकी वाहनातून भरधाव पलायन केल्याचा



आरोप आहे.

या पोलिसांनी एसीबी कर्मचाऱ्याच्या अंगावरच गाडी घालण्याचा प्रयत्न केला. हा लाचखोर पोलिस फरार झाला आहे. खासगी इसम विजय चव्हाण यास ताब्यात घेण्यात आले असून आरोपीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमासह भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक सुलभा राऊत यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार विनोद मार्कंडे, समाधान मोघाड व मो. मुंबशीर यांच्या पथकाने केली. कारवाईचे पर्यवेक्षण पोलीस उपअधीक्षक जगदीश परदेशी यांनी केले. पोलीस अधीक्षक बापू बांगर व अपर पोलीस अधीक्षक सुनील किनगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

### ७ पोलिसांची अवैध वसूलीची हद्द , व्हिडीओतून सिध्द

अवैध धंद्यांवाल्यांकडून व वाहतुक वाल्यांकडून अवैध वसुली करतांनाचा ७ पोलिसांचे व्हिडीओ सिटी न्युज सुपरफास्टकडे प्राप्त असून या प्रकारच्या बातम्याही सिटी न्युज सुपरफास्टने प्रकाशित केल्या होत्या. त्यामध्ये जवळका येथील बीट जमादार अवैध दारू विक्रेत्यांकडून पैसे घेतांना, जिल्हा वाहतुक शाखेच्या दुचाकी धारकाकडून पैसे वसूल करतांनाचा रिसोड येथील अवैध धंद्यांवाल्यांकडून २ पोलिस कर्मचारी पैसे आणतांना तर मानोरा रोडवर ॲटो चालकांकडून पठानी वसूली करतांनाचे व्हिडीओ सिटी न्युज सुपरफास्टकडे प्राप्त झाले होते. त्यांचे वृत्त ही सिटी न्युज सुपरफास्टने प्रकाशित केले. त्यांच्यावर कारवाईही झाली.

# डाबेराव यांच्या भ्रष्टाचाराचा भरला घडा, आता वाशीम जिल्ह्याच्या बाहेर पडा !

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

**वाशिम जिल्हा परीषद शिक्षण विभागातील शिक्षकांच्या पदोन्नती, पदावनत समायोजन, खाजगी समायोजन व इतर सेवा विषयक प्रकरणामध्ये गेल्या तेरा वर्षांपासून प्रचंड मनमानी, शासन निर्णयाची पायमल्ली व शिक्षकांची आर्थिक, मानसिक पिळवणूक केल्याचा गंभीर आरोप असलेले वादग्रस्त प्रभारी गटशिक्षणाधिकारी वाशिम गजानन डाबेराव यांच्या विरोधात -तब्बल १८ शिक्षक संघटना, संचालक व विवीध पदाधिकारी शिक्षम यांनी ऐतिहासिक एल्गार पुकारला आहे.**

## वाशीम जिल्हा परीषदेत भूकंप १८ शिक्षक संघटना एकवटल्या



### संघटनेचा तीव्र आंदोलनाचा इशारा

सदर निवेदनाची तात्काळ हे दखल घेऊन प्रशासननित्यांची वाशिम जिल्हयातून उचलबांगडी करावी अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शिक्षक संघटनानी दिला आहे. या प्रकरणामुळे वाशिम जिल्हयातील शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून भ्रष्ट अधिका-यांचे धाबे दणाणले आहेत. याप्रसंगी आयुक्त कार्यालय कोणते ठोस पाऊल उचलणार याकडे संपूर्ण शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

विवीध आरोपाच्या कारणावरून त्यांचेकडून प्रशासनाने काही दिवसापूर्वी उपशिक्षणाधिकार पदाचा प्रभार काढून वाशिम पं.स. गटशिक्षणाधिकारी पदी स्थापित केले. शिक्षकांच्या असंतोषावर तात्पुरती मलमपट्टी करण्याचा हा प्रकार आहे. वादग्रस्त अधिकारी डाबेराव यांनी आपल्या कार्यकाळात शासन निर्णयांचा सोयीने अर्थ लावून अनेक वेळा चक्रव्युह रचून आजपर्यंत शिक्षकांची आर्थिक, मानसिक पिळवणूक केली आहे. या दडपणाखाली संपूर्ण शिक्षक वर्गाचे आणि शिक्षण क्षेत्राचे प्रचंड नुकसान झाले आहे. होत असून त्यांची तातडीने प्रशासकीय बदली वाशिम जिल्ल्याबाहेर करण्यात यावी व त्याच्या कार्यकाळातील पदोन्नती, समायोजन, पदावनत इतर सेवाविषयक प्रकरणामधील प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी संयुक्त निवेदनात करण्यात आली आहे. जिल्हा परीषदेतील संपूर्ण प्रक्रीया निर्मितीचा केंद्रबिंदू असणारे डाबेराव यांची महत्वाच्या कुठल्याही निर्णयावर स्वाक्षरी नसते हे विशेष.

### सुरक्षिततेचा धडा, यशाची दिशा; केनवड आश्रमशाळेत ठाणेदार भारद्वाजांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●



केनवड येथील अनुदानित आदिवासी आश्रमशाळेत पोलीस निरीक्षक योगिता भारद्वाज यांनी भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांना सुरक्षितता, गुड टच-बॅड टच, ११२ हेल्पलाईन तसेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले.

पोलीस निरीक्षक योगिता भारद्वाज यांनी विद्यार्थ्यांना गुड टच आणि बॅड टच यातील फरक समजावून सांगत, कोणत्याही प्रकारची अडचण, गैरवर्तन किंवा संशयास्पद घटना घडल्यास ती लपवून न ठेवता तत्काळ पालक, शिक्षक किंवा पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले. आपत्कालीन परिस्थितीत पोलिस हेल्पलाईन क्रमांक ११२ वर संपर्क साधता येतो, याबाबतही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी नियमितपणे शाळेत उपस्थित राहून शिक्षणाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. बारावीच्या विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षेला सामोरे जावे, तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करून मोठी स्वप्ने पाहावीत, असा संदेश त्यांनी दिला.

तसेच तक्रार पेटीचा वापर करून नावाने अथवा निनावी तक्रार करता येते, याबाबत विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली. दरम्यान, भारद्वाज यांनी शाळेतील सीसीटीव्ही यंत्रणा व उपलब्ध सोयी-सुविधांची पाहणी केली. याचवेळी फिरत्या आरोग्य पथकाकडून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. कार्यक्रमास बीट जमादार गुरुदेव वानखेडे, पोलीस कर्मचारी पातळे, पोलीस पाटील माणिक खराटे, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# कंटेनर-दुचाकीच्या धडकेत जिवलग मित्रांचा मृत्यू

## एकाच वेळी अंत्ययात्रा; डोणगावात शोककळा

प्रतिनिधी ४ सप्टेंबर



**डोणगाव :** डोणगाव मेहकरकडे दुचाकीने निघालेल्या डोणगाव येथील दोन जिवलग मित्रांचा कंटेनरच्या धडकेत मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना बुधवारी (दि. २) रात्री साडेसात ते पावणेआठच्या सुमारास जालना बायपास ते पुलगाव राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ सी वर घडली. शेख साहिल शेख जफर आणि शेख शाकिब शेख शकील कुरेशी, अशी मृतांची नावे आहेत. दोघांच्याही एकाच वेळी निघालेल्या अंत्ययात्रेमुळे गुरुवारी डोणगावावर शोककळा पसरली होती.

डोणगावातील लक्ष्मीनगर परिसरात राहणारे साहिल आणि शाकिब हे दोघे बुधवारी रात्री दुचाकीने (टीएन ०१ ईजी १४७६) मेहकरकडे जात होते. डोणगावजवळील महामार्गावरील पुलाजवळ त्यांच्या दुचाकीला मेहकरकडून येणाऱ्या कंटेनरने (एनएल ०१ एससी ३९८२) जोरदार धडक दिली. धडकेनंतर दोघेही रस्त्याखाली फेकले गेले आणि गंभीर जखमी झाले. या अपघातात दोघांचाही मृत्यू झाला.

अपघातानंतर मेहकरकडून डोणगावकडे येणारे अमोल धोटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. जखमींना बाहेर काढून १०८ रुग्णवाहिकेला पाचारण करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच डोणगाव पोलिसांनीही घटनास्थळी घेतली.

अपघातप्रकरणी डोणगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली नव्हती. अपघाताची माहिती मिळताच महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून अपघातग्रस्त वाहने बाजूला केली. या प्रकरणाचा पुढील तपास डोणगाव पोलिसांकडून करण्यात येत आहे. या घटनेमुळे डोणगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून, दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# दारूच्या नशेत दुचाकी चालविणे पडले महागात

## मलकापुरात ६७ वर्षीय व्यक्तीवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**मलकापूर :** बसमध्ये चढण्यासाठी झालेल्या गर्दीचा फायदा घेत, चोरट्याने ६० वर्षीय महिलेच्या गळ्याती

गुन्हा दाखल

मलकापूर प्रतिनिधी : मलकापूर शहरातील तहसील चौक परिसरात दारूच्या नशेत दुचाकी वाहन वेडीवाकडी व अनियंत्रित पद्धतीने चालविणाऱ्या ६७ वर्षीय व्यक्तीविरुद्ध मलकापूर शहर पोलिसांनी महाराष्ट्र मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ वामनराव पाटील (वय ६७, रा. दुर्गानगर, देवी मंदिराजवळ, मलकापूर) हे १ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता रेल्वे स्टेशनकडून तहसील चौकाच्या दिशेने त्यांच्या ताब्यातील एमएच १९ एआर ६४७२ क्रमांकाची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल चालवत होते. यावेळी ते वाहन वेडीवाकडी व अनियंत्रित पद्धतीने चालविताना आढळून आले. वाहतूक नियमनाची ड्युटी बजावत असलेले पोलीस कर्मचारी पोको ज्ञानेश्वर मानसिंग राठोड (ब.नं. १७१३) यांनी पंचांसमक्ष वाहन थांबविले. त्यावेळी संबंधित व्यक्ती अडखळत व तोतरे बोलत असल्याचे तसेच त्यांच्या तोंडातून दारूचा उग्र वास येत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर आरोपीची मलकापूर उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी करण्यात आली. वैद्यकीय तपासणीत संबंधित व्यक्तीने दारू सेवन केले असून तो मद्यार्काच्या अमलाखाली असल्याचा लेखी अभिप्राय देण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर राठोड यांच्या लेखी रिपोर्टवरून मलकापूर शहर पोलीस ठाण्यात कायम अप क्र. ६३८/२०२६, कलम १८५ मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेका रोकडे (ब.नं. १८५३) करीत आहेत. दारूच्या नशेत वाहन चालवून स्वतःसह इतरांच्या जीवितास धोका निर्माण करू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# भूमिहीन, गायरान व वनहक्कधारकांचा तहसीलदारांच्या दालनासमोर ठिय्या

## भारतीय समता संघटनेच्या नेतृत्वाखाली आंदोलन

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**खामगाव :** भूमिहीन, गायरानधारक, वनहक्कधारक तसेच आदिवासी पारधी बांधवांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासन व प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ ३ सप्टेंबर रोजी भारतीय समता संघटनेच्या वतीने ठिय्या आंदोलन करण्यात तहसीलदार दालनासमोर तीव्र आले. अतिक्रमित जमिनींचे अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले जमिनीचे पट्टे तातडीने देण्यात यावेत, वनहक्क कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी, तसेच आदिवासी पारधी समाजाला मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा प्रमुख मागण्या आंदोलकांनी केल्या. संघटनेच्या म्हणण्यानुसार, भूमिहीन, गायरानधारक आणि वनहक्कधारक नागरिकांच्या प्रश्नांबाबत शासनस्तरावर वारंवार पाठपुरावा करण्यात आला आहे. विविध मागण्यांसंदर्भात प्रशासनाला निवेदने देऊनही अपेक्षित स्वरूपात ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे नाराजी वाढली आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष अतिक्रमित जमिनींचे पट्टे मिळणे, वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आणि आदिवासी पारधी समाजाला मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध होणे, या मागण्यांकडे वर्षानुवर्षे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनेने केला. वारंवार निवेदने देऊनही प्रश्न मार्गी न लागल्याने अखेर नागरिकांनी तहसील कार्यालयावर धडक देत तहसीलदार दालनासमोर ठिय्या आंदोलन केले.

# दोन महिन्यांमध्ये एचएसआरपी नसलेल्या 425 वाहनांवर कारवाई!

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**खामगाव:** वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक फलक (एचएसआरपी) बसविण्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मुदत संपल्यानंतर १ जुलैपासून एचएसआरपी नंबरप्लेट नसलेल्या वाहनधारकांविरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली आहे. खामगाव उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांत तब्बल ४२५ वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. वाहनांची ओळख अधिक सुरक्षित करणे आणि नंबरप्लेटमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालणे, हा एचएसआरपीमागील प्रमुख उद्देश आहे. संपल्यानंतरही बसविणाऱ्या मुदत न त्यामुळे एचएसआरपी वाहनधारकांवर परिवहन विभागाची कारवाई सुरूच आहे. वाहनधारकांनी दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी आपल्या वाहनाला नियमानुसार एचएसआरपी नंबरप्लेट बसवून घेण्याचे आवाहन परिवहन विभागाकडून करण्यात येत आहे. जेणेकरून भविष्यातील तपासणीदरम्यान होणारी गैरसोय टाळता येणार आहे. एचएसआरपी नंबरप्लेट ॲल्युमिनियमची असून त्यावर विशिष्ट प्रकारची सुरक्षा वैशिष्ट्ये असतात. प्लेटवर लेझरने कायमस्वरूपी ओळख क्रमांक नोंदविला जातो. त्यामुळे नंबरप्लेटमध्ये फेरफार करणे तुलनेने कठीण होते. नंबरप्लेट बदलण्याची गरज का पडते? जुनी किंवा अनधिकृत नंबरप्लेट सहज बदलता किंवा बनावट करता येण्याची शक्यता असते. एचएसआरपीमध्ये सुरक्षा वैशिष्ट्यांचा समावेश असल्याने वाहनांची ओळख अधिक विश्वासार्ह पद्धतीने निश्चित करण्यास मदत होते. वाहन चोरी, गैरवापराला आळा घालण्याच्या दृष्टीनेही महत्त्व आहे. जुन्या वाहनधारकांकडून प्रतिसादाची गरज एचएसआरपीबाबतच्या नियमांमुळे जुन्या वाहनांच्या मालकांनीही आपल्या वाहनाची नोंदणी आणि उपलब्ध अभिलेख अद्ययावत आहेत का, याकडे लक्ष देणे आवश्यक ठरत आहे. अनेक वर्षापासून वापरात असलेल्या वाहनांमध्ये मालकी हस्तांतरण, पत्ता बदल किंवा इतर नोंदणीविषयक बदल झालेले असू शकतात. अशा वाहनधारकांनी एचएसआरपी बसविण्यापूर्वी वाहनाच्या नोंदणीतील तपशील तपासून घेणे गरजेचे आहे. एचएसआरपी नंबरप्लेट बसविताना काय तपासावे ? एचएसआरपी बसविताना वाहनाचा नोंदणी क्रमांक, चेसिस व इतर संबंधित तपशील योग्य आहेत का, याची खात्री करावी. नंबरप्लेट बसविल्यानंतर तिची स्थिती व्यवस्थित आहे का, हेही तपासणे आवश्यक आहे. नंबरप्लेटवर अनधिकृत स्टिकर किंवा बदल करू नये, असा सल्ला उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे. कारवाई टाळण्यासाठी प्रक्रिया आवश्यक एचएसआरपी नंबरप्लेटबाबत वाहनधारकांनी आपले वाहन नियमांच्या कक्षेत येते का, याची माहिती घेऊन आवश्यक प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे असल्याची माहिती परिवहन विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.. नंबरप्लेट बसविण्यासाठी वाहनधारकांनी अधिकृत माध्यमांचा वापर करणे महत्त्वाचे आहे.

# नागेशवाडी, टेंभुरखेडमधील सागवान चोरी प्रकरणी चौकशी

## उपवनसंरक्षकांकडून चार सदस्यीय चौकशी समिती

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**मेहकर :** घाटबोरी वनपरिक्षेत्रातील नागेशवाडी, टेंभुरखेड तसेच इसवी बीट परिसरातील कथित अवैध वृक्षतोड, सागवान चोरी आणि लाकडाच्या अवैध वाहतुकीच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी वनविभागाने चार सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले यांनी १२ जून रोजी केलेल्या तक्रारीची दखल घेत उपवनसंरक्षक, बुलढाणा यांनी चौकशीचे गुरूवारी आदेश दिले आहेत. संबंधित वनक्षेत्रात मौल्यवान वृक्षांची कथितरीत्या तोड करून सागवान लाकडाची चोरी व अवैध वाहतूक होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारांकडे वनविभागातील संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून दुर्लक्ष झाले का किंवा त्यांची काही भूमिका होती का, याचीही निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी टाले यांनी केली आहे. मात्र, हे आरोप अद्याप चौकशीच्या अधीन असून त्याबाबत कोणताही अंतिम निष्कर्ष समोर आलेला नाही. संबंधित ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी, वनविभागाच्या नोंदींची पडताळणी करावी, अशी मागणी टाले यांनी केली आहे. चौकशी समितीत आहे चौघांचा समावेश वनपरिक्षेत्र अधिकारी (संरक्षण) के. डी. पडोळ यांच्या अध्यक्षतेखालील समितीत वनपाल एच. एन. गिते सदस्य सचिव, वनरक्षक एस. एस. माने आणि पोलिस कॉन्स्टेबल सतीश काकड यांचा सदस्य म्हणून समावेश आहे.

# कार-दुचाकी अपघात प्रकरणी गुन्हा दाखल

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**खामगाव :** खामगाव टेंभुर्णा फाट्याजवळ गतिरोधकानजीक दुचाकीला मागून भरधाव कारने धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना २९ ऑगस्ट रोजी रात्री घडली होती. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी ३ सप्टेंबर रोजी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. टेंभुर्णा येथील लक्ष्मण भीमराव मोरे हे अकोला रोडवरील व्यवसाय आटोपून दुचाकी क्रमांक एम. एच. २८ बीटी ७३९६ने घरी परतत होते. टेंभुर्णा फाट्यावरील गतिरोधकाजवळ त्यांनी दुचाकीचा वेग कमी केला. त्याचवेळी मागून आलेल्या एम. एच. ०३ सीएम ९३७६ क्रमांकाच्या कारचालकाने अतिवेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवत त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर मोरे हे रस्त्याच्या खाली फेकले जाऊन गंभीर जखमी झाले. अपघाताचा आवाज ऐकून प्रत्यक्षदर्शींनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्त कारमध्ये चालकासह काही महिला असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले असून, चौकशीदरम्यान कोणतीही माहिती न देता त्यांनी घटनास्थळ सोडल्याचेही म्हटले आहे. प्रत्यक्षदर्शी व नातेवाइकांनी जखमी मोरे यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. त्यांना गंभीर दुखापत झाली असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर निमगावात पोलिसांची बैठक

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**नांदुरा :** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गावातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच चोरीच्या घटनांना आळा बसावा, यासाठी नांदुरा पोलिस प्रशासनाच्या वतीने १ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीला नांदुरा पोलिस ठाण्याचे ठाणेदार जयवंत सातव उपस्थित होते. बैठकीत गावातील प्रमुख मार्ग, चौक तसेच प्रवेशद्वारांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत चर्चा करण्यात आली. सरपंच विकास इंगळे यांनी गावातील दोन ते तीन प्रमुखप्रवेशद्वारांसह महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत तयारी दर्शविली. यावेळी सहायक पोलिस उपनिरीक्षक गजानन इंगळे, श्रीधर काळे, पोलिस अंमलदार संजय वराळे, गणेश नागरे, देवा शेजुळे, निमगाव ग्रामपंचायतचे सदस्य, पत्रकार विवेक पाऊलसगडे, ग्रामसुरक्षा दलाचे पदाधिकारी आदी उपस्थित होती.

# जामोद येथे मीटर बायपास करून वीजचोरी करणारे दोन जण गजाआड

## खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**खामगाव :** घराबाहेरील वीजवाहिनीवर आकडे टाकून थेट वीजपुरवठा घेऊन वीज मीटरला बायपास देत वीजचोरी केल्याप्रकरणी गुरुवारी जामोद येथील दोन जणांवर खामगाव पोलिसांनी वीज अधिनियम, २००३ याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मंगेश मोतीलाल कपले (२८) व गुलाबराव बाबूलाल निहाल (४५), दोघेही रा. जामोद, अशी गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तींची नावे आहेत. महावितरणचे सहाय्यक अभियंता तुषार श्रीराम हिंगणे यांनी दिलेल्या लेखी फिर्यादीनुसार, महावितरणच्या पथकाने पंचांसमक्ष जामोद येथे तपासणी केली.

त्यावेळी दोन्ही आरोपी त्यांच्या घरासमोरील लघुदाब वीजवाहिनीवर सुमारे २० फूट लांबीच्या काळ्या रंगाच्या सर्व्हिस वायरच्या साहाय्याने आकडे टाकून, वीज मीटर बायपास करून घरासाठी अनधिकृतपणे वीज वापरत असल्याचे आढळून आल्याचा दावा फिर्यादीत करण्यात आला आहे. पोलिस नोंदीनुसार, मंगेश कपले याने मागील १२ महिन्यांच्या कालावधीत २१९ युनिट वीज वापरल्याचे नमूद असून, त्याची वीज किंमत ६ हजार १८० रुपये व तडजोड आकार २ हजार रुपये, अशी एकूण ८ हजार १८० रुपयांची रक्कम आहे. तर गुलाबराव निहाल याच्याकडूनही २१९ युनिट वीजचोरी झाल्याचे नमूद असून, वीज किंमत ३ हजार ११० रुपये व तडजोड आकार २ हजार रुपये, अशी एकूण ५ हजार ११० रुपयांची रक्कम आहे. या कारवाईत वीजचोरीसाठी वापरण्यात आल्याचा आरोप असलेली २० फूट लांबीची काळ्या रंगाची सर्व्हिस वायर, किंमत ४०० रुपये, जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक किशोर बर्वे करीत आहेत.

# खुल्या प्रवर्गातील युवक-युवतींसाठी 42 कौशल्य विकास अभ्यासक्रम

## अभ्यासक्रमाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येणार

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**बुलढाणा :** आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योगक्षेत्रातील संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे आणि भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयांतर्गत कार्यरत एमएसएमई तंत्रज्ञान केंद्र-इंडो जर्मन टूल रूम यांच्या संयुक्त विद्यमाने खुल्या प्रवर्गातील युवक-युवतींसाठी ४२ कौशल्य विकास अभ्यासक्रमांचे मोफत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. अमृतच्या लक्षित या खुल्या प्रवर्गातील प्रशिक्षणासाठी अर्ज करू शकतात. अभ्यासक्रमानुसार दहावी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पदविका, पदवी किंवा अभियांत्रिकी शिक्षणाची पात्रता आवश्यक आहे. प्रशिक्षण विविध केंद्रांवर होणार आहे. अर्जाची अंतिम मुदत ११ सप्टेंबर २०२६ असून, अधिक माहितीसाठी अमृत जिल्हा कार्यालय, तिसरा मजला, बुलढाणा प्राइड बिल्डिंग, तहसील कार्यालयासमोर, बुलढाणा येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले. मोफत प्रशिक्षण प्रशिक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून निवासी प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना निवास आणि भोजनाची सुविधाही विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संगणकाधारित रचना, संगणक नियंत्रित यंत्रसामग्री, स्वयंचलन, रोबोटिक्स, त्रिमितीय मुद्रण, मेकॅट्रॉनिक्स, विद्युत, स्थापत्य आणि यंत्र देखभाल या क्षेत्रांतील प्रशिक्षणाचा यात समावेश आहे. संगणक रचना, घनरचना, यंत्र अभिकल्प, संगणकीय विश्लेषण, संगणक नियंत्रित यंत्रप्रक्रिया, कार्यक्रमनियोजन, यांसारखे अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. लाभ घेण्याचे आवाहन पात्र युवक-युवतींनी या संधीचा लाभघ्यावा, असे आवाहन अमृतचे जिल्हा व्यवस्थापक जिग्नेश कमाणी यांनी केले आहे.

# नागरिकांची 'पंचाईत' थांबणार; ग्रामसेवकांची 'बायोमेट्रिक' हजेरी!




## ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर जीपीएसचीही नजर; लेटलतीफ, कर्मचाऱ्यांना बसणार चाप

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**खामगाव:** ग्रामपंचायतींच्या कामकाजात शिस्त आणि पारदर्शकता आणण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची हजेरी आता बायोमेट्रिक प्रणालीद्वारे घेण्याची तयारी करण्यात आली आहे. त्यासोबतच जीपीएस प्रणालीच्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून उपस्थितीवरही नजर ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे कार्यालयीन वेळेत अनुपस्थित राहणाऱ्या अथवा वारंवार उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांना चाप बसण्याची शक्यता आहे.

ग्रामपंचायत ही ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध शासकीय सेवा आणि दाखले मिळविण्याचे महत्त्वाचे केंद्र आहे; मात्र अनेकदा संबंधित कर्मचारी कार्यालयात उपलब्ध नसल्याने नागरिकांना कामासाठी वारंवार ग्रामपंचायत कार्यालयाच्या चकरा माराव्या लागतात. कर्मचारी वेळेवर कार्यालयात उपस्थित राहावेत आणि नागरिकांना सेवा वेळेत मिळावी, यासाठी हजेरी व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देण्यात येत आहे.

### कामासाठी येणाऱ्या नागरिकांचे हेलपाटे थांबणार

» ग्रामपंचायतीत विविध दाखले, नोंदी, कर आकारणी, शासकीय योजनांशी संबंधित कामे तसेच इतर प्रशासकीय सेवांसाठी नागरिक येतात. संबंधित कर्मचारी कार्यालयात वेळेवर उपलब्ध राहिल्यास नागरिकांची कामे वेळेत होण्यास मदत होईल. त्यामुळे एका छोट्याशा कामासाठी वारंवार ग्रामपंचायत कार्यालयात जाण्याची वेळ नागरिकांवर येणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### नियम जुना; मात्र अंमलबजावणी रखडलेली

» ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून नागरिकांना सेवा देणे ही नवीन बाब नाही. कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत यापूर्वीपासूनच नियम आणि शिस्तीच्या तरतुदी आहेत; मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये अनेक ठिकाणी त्रुटी राहिल्याच्या तक्रारी होत्या. आता बायोमेट्रिक आणि जीपीएससारख्या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे या नियमांची प्रभावी अंमलबजावणी होण्याची अपेक्षा आहे.



# शाडू माती गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेत 20 हजारावर विद्यार्थी सहभागी

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अकोला :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत २० हजारावर विद्यार्थ्यांनी शाडू मातीच्या गणेश मूर्ती तयार केल्या. जन्माष्टमीच्या मंगल दिनी चार ठिकाणी सकाळी ८ वाजता शहरातील उपक्रमाचा शुभारंभ झाला. नगरसेवक निलेश देव मित्र मंडळ कडून चार ठिकाणी आयोजित ऐतिहासिक उपक्रमासाठी भव्य सभामंडपांसह साहित्य वितरण आणि मार्गदर्शनाची संपूर्ण यंत्रणा सज्ज होती.

वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या अंजलीताई आंबेडकर, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने, प्रदीप नंद, डॉ. माधव देशमुख आणि मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. विशेष म्हणजे अंजलीताई आंबेडकर यांनी चारही ठिकाणी जाऊन कार्यशाळेची पाहणी केली. छत्रपती

## अकोला शहरात इतिहास घडला




शिवाजी महाराज मैदान, तापडिया नगर; स्व. शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे पटांगण जुने शहर; जानोरकर मंगल कार्यालय रिंग रोड आणि प्रभात किड्स स्कूल, पातूर रोड या चार ठिकाणी कार्यशाळा झाली.

कार्यशाळेचे मार्गदर्शक व प्रशिक्षक म्हणून शरद कोकाटे प्रा. डॉ. ज्ञानसागर भोकेर, प्रा. गजानन बोबडे, श्रीमती कल्पना राव, सौ. अमृता सेनाड व त्यांच्या टीमने विद्यार्थ्यांना मूर्तीनिर्मितीचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले. या उपक्रमासाठी गजाननजी नारे, डॉ.सुगत वाघमारे,प्रदीप नंद, माधवराव देशमुख, शार्दुल दिंगबर, विक्रम जानोरकार, प्रा. कुशल सेनाड, डॉ. पल्लवी दिवेकर आणि सौ. दिप्ती अग्रवाल यांचे मोलाचे सहकार्य लाभले. पर्यावरणाचा संदेश देणाऱ्या याच दिवशी अकोल्यात महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचीही नवी दिशा दाखविली जाणार आहे. शुक्रवार, ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज मैदान, तापडिया नगर येथे 'तेजस्वी आत्मनिर्भर महाबाजार'चा भव्य शुभारंभ होणार आहे. महाबाजार ४ ते ६ सप्टेंबर दरम्यान सुरू राहणार आहे. या उपक्रमास अकोला महानगरपालिका, सुखकर्ता पर्यावरणपूरक अभियान, स्व. शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, प्रभात किड्स स्कूल, इनर व्हील क्लब ऑफ अकोला क्वीन्स, बाबासाहेब ढोणे चित्रकला महाविद्यालय आणि जानोरकर मंगल कार्यालय यांचे सहकार्य लाभत आहे. शुभारंभ प्रसंगी संचालन दिलीपराव देशपांडे यांनी केले तर प्रास्ताविक सौ. रश्मी देव यांनी केले. यशस्वी आयोजनात जयंतराव सरदेशपांडे, गणेश मैराळ, शैलेश देव, राजू गुन्नरवार, श्याम नेने, निलेश पवार, प्रकाश जोशी, अनिल गोपुलवार, विजय वाघ, नरेंद्र परदेशी, रवी मेश्राम, संजय गुप्ता, राजू सोनी, किरण चौक, प्रदीप बांधवकर, डॉ. वाघमारे, भास्कर बैतवार, निलेश दुधलम यांच्यासह निलेश देव मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.





# यंदा बैलपोळ्यावर दुष्काळाचे सावट

## सिंदखेडच्या बाजारात बैल जोड्यांचे घसरले भाव

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अकोला :** जिल्ह्यातील सिंदखेड येथे दर गुरुवारी भरणाऱ्या जनावरांच्या बाजारावरही यंदा दुष्काळाचे सावट स्पष्टपणे दिसून आले.

चारा-पाण्याची समस्या निर्माण झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी 3 सप्टेंबर रोजी भरलेल्या बाजारात आपल्या बैलजोडी विक्रीसाठी आणल्या होत्या, परंतु दुष्काळी परिस्थिती समोर दिसत असल्याने अनेकांनी खरेदीकडे पाठ फिरवली. विकल्या गेलेल्या बैलांनाही अपेक्षित भाव मिळाला नाही. एक लाख रुपये किमतीच्या बैलजोडीचा भाव २५ ते ३० हजारांनी घसरल्याने एक प्रकारे सर्जा राजाचा थाट उतरला आहे. सिंदखेडच्या आठवडी बाजारात पातुर आलेगाव बार्शीटाकळी तसेच वाशिम जिल्ह्यातून बैल विक्रीसाठी येतात. गुरुवारच्या (दि. 3) बाजारात सुमारे 200 बैल विक्रीसाठी आले होते.

मात्र शेतकऱ्यांना एक बैलजोडी ७० हजार रुपयांना विकावी लागली. यामध्ये २५ ते ३० हजार रुपयांनी भाव उतरले. मागील एक महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने १ लाख रुपये किमतीच्या बैलजोडीचा भाव २५ ते ३० हजारांनी घसरला आहे.



### यंदा पोळ्यावर दुष्काळाचे सावट

» मागील एक महिन्याहून अधिक काळापासून जिल्ह्यात पावसाने दडी मारली आहे. पाऊस न झाल्याने जिल्ह्यातील खरिपाचे पीक धोक्यात आले आहे पावसाची कोणतीही चिन्हे दिसत नसल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. त्यातच बैलजोडी आणि गुराढोरांच्या चारा- पाण्याचे मोठे संकट येण्याची भीती आहे. त्या मुळे अनेकांनी आपली जनावरे विक्रीस आणली खरी, पण अनेकांना ग्राहकच भेटले नाहीत.

» पावसाने दडी मारल्यामुळे जनावरांच्या चारा व पाण्याची टंचाई निर्माण होऊ शकते. त्यामुळे जनावरे जगवायची कशी, असा प्रश्न आहे. त्यामुळे पशुधन विक्रीसाठी आणले आहे. परंतु त्यांना ग्राहक मिळेनासे झाले आहे यंदा दुष्काळाचे सावट असल्याने पशुधन घेण्याकडे शेतकरी तसेच व्यापारी पाठ फिरवत आहेत

**यशवंत शिंदे,** शेतकरी

# जवाहर नगर येथे 5 सप्टेंबरला घुमणार 'गोविंदा आला रे'

## भाजप प्रभाग १३ तर्फे भव्य दहीहंडीचे आयोजन

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अकोला :** गोपाळांच्या जल्लोषात आणि पारंपरिक उत्साहात अकोला शहरातील जवाहर नगर भाग दुमदुमण्यासाठी सज्ज झाला आहे. भारतीय जनता पार्टी प्रभाग क्रमांक १३ आणि 'युवा प्रतिष्ठान' यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी शनिवारी, ५ सप्टेंबर २०२६ रोजी भव्य 'दहीहंडी उत्सव २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. खा.अनुप धोत्रे, आ.रणधीर सावरकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, जयंत मसने यांच्या मार्गदर्शनात प्रभाग क्रमांक १३ च्या नगरसेविका सुनिता अग्रवाल, प्राची निलेश काकड आणि विशाल इंगळे यांनी संयुक्तपणे हे आयोजन केले आहे. छत्रपती संभाजी पार्क, जवाहर नगर येथे रंगणाऱ्या या सोहळ्यात दहीहंडी फोडण्यासाठी अकोला शहरासह परिसरातील अनेक नामांकित गोविंदा पथके थर रचणार आहेत.

शनिवार, ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा सोहळा होईल. छत्रपती संभाजी पार्क, जवाहर नगर, प्रभाग क्र. १३, अकोला या कार्यक्रमाचे आयोजन भारतीय जनता पार्टी (प्रभाग क्र. १३) आणि युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. 'एकता, उत्साह आणि परंपरेचा संगम' हे ब्रीदवाक्य घेऊन या महोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने परिसरात आकर्षक रोषणाई आणि भव्य व्यासपीठ उभारण्यात येणार आहे. सुरक्षेच्या आणि वाहतूक नियंत्रणाच्या दृष्टीने आयोजकांकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. भारतीय जनता पार्टी प्रभाग १३ चे पदाधिकारी आणि युवा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत. अकोला शहरातील नागरिकांनी तसेच भाविकांनी या उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन गोविंदांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.






### दहिहंडी उत्सवासाठी 'चलो छत्रपती संभाजी पार्क'

» या दहिहंडी उत्सवातील विजेत्या गोविंदा पथकासाठी २१,०००/- (२१ हजार रुपये) चे प्रथम बक्षीस ठेवण्यात आले आहे. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणून शिवधून ढोल ताशा पथक (अकोट) आणि आर जे दिव्या यांची विशेष उपस्थिती असणार आहे. अनिल सुनिल मुरुमकार तसेच युवा प्रतिष्ठान यांच्या वतीने हे आयोजन करण्यात आले आहे. अॅड. वृषाली लुंगे, सोनलताई ठक्कर, रुपाली धोत्रे, संध्या गोडा, सुषमा जैन, स्वाती लटोरीया, पुजा मुरुमकार, कीर्तीताई काबरा, ऋचाताई पाटील, रेणुका जानोरकर, स्वाती मानकर, रसिका पारधी, दिपाली राऊत, प्रियंका पोटे, योगिता माकोडे, प्रिती पाटील, सरिता शर्मा, रुपाली खरात, आणि अनिता जायलवाल, योगेश मानकर, सुनिल जानोरकर, शरद ढगे, मोहनजी भगत, नरेश लटोरीया, दिपक जुनगडे, भावेश खिलोसिया, सुनिलजी फोकमारे, कपिल मुरुमकार, उकेडराव सोनोने, दिग्विजय जोशी, अरविंद अग्रवाल, विजय केडिया, विनोद देशमुख, सुनील गिन्हे, संतोष सावरकर, किरण देशपांडे, रूपम घाटोळ, शेखर देशमुख, प्रशांत गावत्रे, प्रशांत देशमुख, मंगेश सोनटक्के, प्रशांत गावत्रे, हिमांशू शर्मा, मयुर राजेश शर्मा, जयंत लोनकर, गौरव भट्टड, बबलु वाघमारे, गोपाळ मंडाळे, प्रविण पोटे, मंगेश माकोडे, नरेश अण्णा गरे, प्रविण राऊत, पंकज ठाकरे, जितुभाऊ पाटकर, संतोष दाभाडे, प्रथमेश देशमुख, हेमेंद्र सोनारीवाल, प्रफुल खरात, शिवम कांगटे, अभिजीत कडू, अजय पाटील, राजु सिंगनाथ, गोपाल पारधी, सागर कावरे, अमोल अग्रवाल, श्रीकांत लोनकर, उदय बैस, आणि भुषण पाटकर अकोला शहरातील सर्व नागरिकांनी व गोविंदा प्रेमींनी या दहिहंडी उत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# महापालिकेत गणेशोत्सव मंडळांसाठी एक खिडकी कार्यान्वित

प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अकोला:** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना गणेशोत्सवाच्या कालावधीत मंडप उभारणी, ध्वनिक्षेपक, पोलीस विभागाची परवानगी तसेच इतर आवश्यक प्रशासकीय परवानग्या महापालिका सभागृहात एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. यासाठी कक्ष कार्यरत झाला आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन महापौर सौ. शारदा खेडकर, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी केले आहे. गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांना कोणताही नाहक त्रास सहन करावा लागणार नाही. याची प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निर्देश महापौर सौ. शारदा रणजित खेडकर यांनी दिले.



# शासकीय निवासस्थानी कोणी राहणार नाही तर दुरूस्ती कशासाठी?

अनवर खान ४ सप्टेंबर

**मुर्तीजापुर :** शहरातील सिव्हिल लाईन परिसरातील शासकीय निवासस्थानांच्या दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने या खर्चाच्या औचित्यावरून नागरिकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सिव्हिल लाईन परिसरात मोठ्या प्रमाणात शासकीय निवासस्थाने उपलब्ध आहेत. मात्र, यातील अनेक निवासस्थानांमध्ये अधिकारी अथवा कर्मचारी वास्तव्यास नसल्याचे चित्र यापूर्वीही निदर्शनास आले होते.

यासंदर्भात सिटी न्यूज सुपरफास्ट वृत्त प्रकाशित झाल्यानंतरही सदर निवासस्थानांच्या वापराबाबत ठोस चित्र स्पष्ट झालेले नाही. अशातच आता याच परिसरातील काही शासकीय घरांच्या दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने नागरिकांकडून विविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत. ज्या निवासस्थानात कोणीही राहत नाही, त्या घराची दुरुस्ती नेमकी कोणासाठी? असा थेट सवाल नागरिकांकडून केला जात आहे. भविष्यात एखादा अधिकारी किंवा कर्मचारी येथे वास्तव्यास येणार असेल, तर त्यासाठी कोणती प्रशासकीय योजना आहे? तसेच कोणत्या निवासस्थानांची दुरुस्ती आवश्यक आहे, याचे सर्वेक्षण करण्यात आले आहे का? दुरुस्तीच्या कामासाठी किती निधी मंजूर झाला आहे आणि त्याचा अपेक्षित उपयोग काय आहे, याबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणीही नागरिकांमधून पुढे येत आहे. शासकीय मालमत्तेची देखभाल-दुरुस्ती करणे ही प्रशासनाची नियमित प्रक्रिया असली, तरी दुरुस्तीची गरज, निवासस्थानाचा प्रत्यक्ष वापर आणि खर्चाचे प्राधान्य यांचा विचार होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शहरात आजही रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, नाल्या, सार्वजनिक सुविधा आणि इतर नागरी समस्यांकडे निधीची आवश्यकता असताना वापरात नसलेल्या निवासस्थानांवर होणाऱ्या खर्चाचे औचित्य काय, असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, संबंधित शासकीय निवासस्थानांची सद्यस्थिती, दुरुस्तीपूर्व स्थिती, मंजूर निधी, दुरुस्तीची आवश्यकता आणि भविष्यातील वापर याबाबत संबंधित विभागाने पारदर्शकपणे माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी जोर धरत आहे. 'सरकारी पैसा हा जनतेचा पैसा आहे; त्यामुळे प्रत्येक रुपयाचा खर्च गरज आणि उपयोगिता पाहूनच व्हावा,' अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत असून, प्रशासन या प्रश्नांची काय उत्तरे देते, याकडे मुर्तीजापुरकरांचे लक्ष लागले आहे. वापरात नसलेल्या शासकीय निवासस्थानांची दुरुस्ती का केली जात आहे?, या निवासस्थानांमध्ये भविष्यात कोणते अधिकारी-कर्मचारी राहणार आहेत?, दुरुस्तीच्या कामासाठी किती निधी मंजूर झाला आहे?



सिटी न्यूज सुपरफास्ट IMPACT

# हरिहर शिवभक्त मंडळाच्या वतीने सामूहिक हनुमान चालीसा व भजन संध्या

## उद्या प्राचीन हरिहर मंदिर येथे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



प्रतिनिधी ४ सप्टेंबर

**अकोला :** मानाचा स्थान असलेल्या हरिहर शिवभक्त मंडळाच्या वतीने यंदा २८ व्या वर्षानिमित्त विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सामूहिक हनुमान चालीसा पठण, भव्य भजन संध्या तसेच कावड महाआरतीचे आयोजन करण्यात आले असून, उद्या शनिवारी सायंकाळी ८ वाजता कावड महाआरती ने कार्यक्रमाची सुरुवात होईल.

तसेच रविवारी सकाळी ११ वाजता कावड प्रस्थानापूर्वी कावड व कलश पूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी परिसरातील नागरिकांच्या वतीने कावड यात्रेवर पुष्पवृष्टी करून शिवभक्तांना शुभेच्छा देण्यात येणार आहेत.

या सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा परिसरासह शहरातील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन हरिहर शिवभक्त मंडळाचे अध्यक्ष मनीष प्राणजाळे यांनी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने केले आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135